


कृतिशील मैत्र

Ishanya Varta ₹ 30/-

# ईशान्य वार्ता

वर्ष ७, अंक ३, मार्च २०१९, मूल्य ₹ ३०/-




## अयांग

सेवाभावी संस्था,
अरुणाचल

## पहिली महिला न्यायाधीश




जावेप्लू चाई, अरुणाचल







## मुक्ता शुज इंडस्ट्री

मुक्तामणीदेवी, मणिपूर

# ईशान्य वार्तातर्फे श्री. चंद्रशेखर टिळक यांचे अभिनंदन.

## आर्थिक विषयावरील ३००० व्याख्यानांचा विक्रम




ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ श्री. चंद्रशेखर टिळक यांच्या आर्थिक विषयावरील ३००० व्याख्यानांची पूर्तता झाली. त्यानिमित्त डोंबिवलीत टिळक नगर शिक्षण प्रसारक मंडळ आणि मधुमालती एंटरप्रायझेस यांच्या संयुक्त विद्यमाने १७ फेब्रुवारी रोजी श्री. टिळक यांचे व्याख्यान व त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. ईशान्य वार्तातर्फे श्री. चंद्रशेखर टिळक यांचे अभिनंदन.

# ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ श्री. चंद्रशेखकर टिळक यांच्यातर्फे पूर्वांचल वसतिगृहांना आर्थिक मदत

गेली वीस पेक्षा अधिक वर्षे NSDL चे Executive Vice President म्हणून कार्यरत असणारे, तसेच तत्सम विषय हाताळणारे डोंबिवलीचे एक लाडके व्यक्तिमत्त्व श्री. चंद्रशेखरजी मोरेश्वर टिळक यांना यंदाचा डॉ. रामचंद्र प्रल्हाद पारनेरकर अर्थशास्त्र पुरस्कार २०१९ जाहिर झाला. अर्थशास्त्र अगदी सहजपणे, सर्वांना समजेल अशा भाषेत मांडणे ही त्यांची विशेष ख्याती आहे.




पुरस्कार स्वीकारतांना सौ. प्राजक्ता ओक व श्री. मुकुंद कुलकर्णी

आपल्या देशातील प्रत्येकाला त्याची पहिली गरज अन्न हे मिळायलाच पाहिजे आणि त्यासाठी आर्थिक नियोजन कसे केले पाहिजे, या विषयाचा धागा पकडून त्यांनी पूर्वांचलातील परिस्थिती थोडक्यात सांगितली. ईशान्यभारतात पिकणारी फळं व त्यांचा बाकी भागांना होणारा पुरवठा किती मोठ्या प्रमाणात आहे हे लक्षात आणून दिले. संपूर्ण पूर्वांचल पायी फिरुन बघताना जाणवलेल्या गोष्टी सांगताना टिळक म्हणाले, “तिथली परिस्थिती, संस्कृती, खाद्य संस्कृती सारं काही आपल्यापेक्षा वेगळं आहे. त्यांची ताकद ही इतर लोकांपेक्षा खूप जास्त आहे आणि म्हणूनच त्या भागातील उत्तम खेळाडू पुढे आले आहेत. कुठलाही खेळाडू प्रसिध्दीसाठी कधीच पुढे येत नाही. जणू खेळ हा त्यांचा सहजगुण आहे असे वागतात. असे अनेक मुद्दे त्यांनी अतिशय सहजपणे मांडले. ■

# ईशान्य वार्ता

वेध ईशान्येचा - वेध परिवर्तनाचा RNI Reg. No. MAHMAR/2012/45108

वर्गणी दर - वार्षिक रु. ३००/-
द्वैवार्षिक रु. ५००/-
त्रैवार्षिक रु. ८००/-

Email - friendsofne@gmail.com


## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ● संवाद | .... | ०४ |
| ● संपादकीय | ..... | ०५ |
| ● उजळमाथ्याने वावरणारे गद्दार | नरेंद्र प्रभू | ०७ |
| ● संघविरोधात विषारी प्रचार | संजय काठे | १० |
| ● अगरबत्तीची मूळ कथा | दयानंद सावंत | १२ |
| ● निनगोल चकौबा सण, मणिपूर | डॉ. स्वाती गाडगीळ | १४ |
| ● अरुणाचलातील पारंपारिक दागिने | ...... | १६ |
| ● वसतिगृह वृत्त | ...... | १७ |
| ● आसामी चित्रपट "रेनबो फिल्डस्" | अनुवादित | १८ |
| ● अरुणाचलचा जांभळा चहा | सुभाष जोशी | ३० |
| ● ओळख ईशान्य भारताची प्रदर्शन | प्रतिनिधी | ३१ |


### जागतिक महिला दिन - विशेष लेख


| | | |
|---|---|---|
| ● हातशिवणीचे मुक्ता शूज, मणिपूर | जयवंत फडके | २० |
| ● "आयांग" संस्थेच्या श्रीमती इनि ताल्लो | अनुवादित | २२ |
| ● न्यायाधीश श्रीमती जावेल्पु चाई, अरुणाचल | निवेदिता खांडेकर | २४ |
| ● अरुणाचलातील समाजशक्तीचं दर्शन | अमिता आपटे | २६ |
| ● माझे पूर्वांचलातील सेवाकार्य | श्वेता काणे | २८ |



**संपादक**
पुरूषोत्तम रानडे
९९६९०३८७५९
९९६९१४९७७१

**पत्रव्यवहार**
१३, कृष्ण कुटीर, आयरे रोड,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१. जि. ठाणे.

**प्रकाशक**
जयवंत कोंडविलकर
९६१९७२०२१२
९ जयगायत्री, गोपाळनगर, रस्ता क्रं १,
डोंबिवली (पूर्व) ४२१२०१.

**समन्वयक**
संजय काठे : ९९६९००९२५५

**मुखपृष्ठ**
रवि थेटे : ९८५०९३८०८१



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही. त्याचप्रमाणे या अंकातील लेखकांच्या विचारांशी संपादक वा प्रकाशक हे ही सहमत असतीलच असे नाही.

संवाद

## आपली अडचण समजली

दिनांक १८ एप्रिल २०१८ रोजी त्रैवार्षिक वर्गणी रु. ८००/- मी एनईएफटी द्वारे आपल्या बँकेत खात्यात जमा केली. परंतु अनेक महिने उलटूनही पावती न आल्याने चौकशी केली. तेव्हा माझ्या नावे रक्कम जमा नसल्याचे कळले. तसेच सतीश या नांवे रु. ८००/- जमा आहेत असेही समजले. तेव्हा उलगडा झाला, की सतीश पाठक यांच्या खात्यातून ही रक्कम जमा झाली होती व ही वर्गणी माझ्या सभासदत्वाची आहे हे आपणास कळणे शक्य नव्हते. आपली जी गैरसोय झाली त्याबद्दल क्षमस्व.

**- राजश्री पाठक, सतीश पाठक - अंधेरी**

.....असाच प्रकार अन्य काही वर्गणीदारांच्या बाबतीत झाला असण्याची शक्यता आहे. म्हणून विनंती, की पैसे भरुनही ज्यांना अद्याप पावती मिळाली नसेल त्यांनी संपर्क साधावा. आणखी एक सुचवावेसे वाटते की वर्गणी बँक खात्यावर जमा केल्यावर, व्हॉटस् ॲप वरुन न कळविता **एसएमएस च करावा.** कारण एसएमएस वरील संदेश सलगपणे वाचता येतात व सेव्ह करुन ठेवणेही सोयीचे असते. उलट व्हॉटस्ॲप च्या जंजाळातून **एखाद्याने चौकशी केल्यास त्याचा शोध घेणे कठीण जाते.** अनेक संस्थांनाही अशाच अडचणींचा सामना करावा लागत आहे. म्हणून बँकेत पैसे जमा केल्यावर **ईमेल** किंवा **एम्एमएस् करुनच तपशील कळवावा**, अशी विनंत आहे.

**- संपादक**

---

## प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित लेख हे वैशिष्ट्य

ईशान्य वार्ताचे अंक सुंदर चित्रांनी नटलेले, आटोपशीर तसेच साध्या पण जिव्हाळ्याच्या भाषेतील लेखांनी सजलेले असतात. तसेच माहितीपूर्ण लेख, प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित असल्याने अतिशय वाचनीय असतात. एकराष्ट्रीयत्वाची जाणीव महाराष्ट्रातील जनतेला करुन देण्याचे महत्कार्य या मासिकाने, आपण व आपल्या सहकाऱ्यांमार्फत सुरु ठेवले आहे त्याबद्दल मन:पूर्वक अभिनंदन, धन्यवाद!

**- सुमन महादेवकर, पुणे**

---

## "विकास दर्शन" - संदर्भमूल्य प्राप्त झालेला अंक

ईशान्य वार्ता फेब्रुवारी २०१९ चा अंक आपण एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवला आहे. आपले आसामी जनतेसाठीचे ईशारेवजा निर्भिड संपादकीय. तसेच श्री. सुभाष जोशी अनुवादित रस्ते, रेल्वे व पूलबांधणी विषयी लेख तसेच नकाशे यांची सुंदर गुंफण घातली गेली आहे. श्री. जोशी यांचेही अभिनंदन. एकूण सर्वच अंकाला संदर्भमूल्य प्राप्त झाले आहे.

**- जयवंत फडके, पुणे**

*संपादकीय......*

# नागरिकता संशोधन विधेयक २०१६
## विरोधाचे दुटप्पी राजकारण

*या विधेयकाला विरोध होण्याचे जे कारण सांगितले गेले ते असे, की या विधेयकाच्या आडून भाजप आपला हिंदुत्वाचा, हिंदू राष्ट्राचा अजेंडा पुढे करीत आहे. नागालँड, मिझोरम आणि मेघालय ही राज्ये उघडउघड ख्रिस्तीधर्मीय राज्ये म्हणून घोषित केली गेली आहेत. सध्याच्या आंदोलनात चर्चने काही ठिकाणी पडद्याआडून तर काही ठिकाणी उघडउघड भूमिका घेतली होती. मिझोरममधील निदर्शनात तर चर्च संचलित शाळांतील मुलांना निदर्शनात सहभागी होण्यास भाग पाडण्यात आले. अशा स्थितीत या विधेयकाला धार्मिक कारण देऊन विरोध व्हावा हे दुटप्पीपणाचे लक्षण आहे.*

■ ■ ■

लोकसभेने संमत केलेले नागरिकता संशोधन विधेयक १२ फेब्रुवारी रोजी राज्यसभेत मंजूरीसाठी मांडण्यावर केंद्र सरकार ठाम आहे, असे चित्र निर्माण झाल्यावर ईशान्य भारतातील सर्व राज्यात त्याला जो विरोध दर्शविण्यात आला तो खरोखरच अचंबित करणारा आहे. जणू काही केंद्र शासनाविरुध्दची लढाई लढतो आहोत असे स्वरुप या विरोधाला देण्याचा प्रयत्न झाला. विद्यार्थी संघटना, सामाजिक संस्था आणि एनडीएचे घटकपक्ष आणि विरोधीपक्ष सर्वचजण विरोधासाठी रस्त्यावर उतरले. मणिपूरमध्ये तर परिस्थिती हाताबाहेर जाईल की काय इतका तीव्र विरोध या विधेयकाला झाला. जमावबंदी आदेश लागू करण्यात आला. सुरक्षा दलाच्या अतिरिक्त तुकड्या कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्यासाठी सज्ज ठेवण्यात आल्या. इंटरनेट आणि मोबाईल सेवा खंडित करण्यात आली.

मेघालयाचे मुख्यमंत्री कोनराड संगमा यांनी तर कोणत्याही क्षणी एनडीएमधून बाहेरपडण्याची धमकी दिली. मणिपूरचे मुख्यमंत्री बीरेंनसिंह यांना लोकक्षोभाचा सामना करावा लागला आणि परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी सर्व पक्षीय शिष्टमंडळासह दिल्लीत मुक्काम ठोकावा लागला. मिझोरममधील निदर्शनात स्वतंत्र मिझो नेशनचे फलक दाखवण्यात आले व पुन्हा एकदा भारताविरुध्द लढण्याची भाषा केली गेली.

या सर्व परिस्थितीचा एकूण प्रचंड दबाव लक्षात घेता राज्यसभेत हे विधेयक न मांडण्याचे भाजपाने ठरवले आणि सर्वांनीच सुटकेचा नि:श्वास सोडला. आणि क्षणात चित्र बदलले. जातीयवादी केंद्र सरकारचा जणू आपण पराभव केला या अविर्भावात लोकांनी रस्त्यावर उतरुन जल्लोष साजरा केला. मिठाई वाटली, फटाके फोडले. बीरेनसिंह मणिपूरला परतले

तेव्हा एखाद्या विजयीवीराच्या थाटात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी त्यांचे जंगी स्वागत केले आणि परिस्थिती हळू-हळू पूर्वपदावर येऊ लागली.

या सर्व प्रकरणातून लक्षात घेण्याची बाब अशी की, सर्वधर्मसमभावाच्या नावाखाली अन्य समाज घटकांना न्याय मिळू शकतो पण हिंदू निर्वासितांना नाही, स्वत:च्या देशातच नाही! यापेक्षा आणखी क्रूरपणा आणि लोकशाही, सर्वधर्मसमभावाची विडंबना काय असू शकते? खरंतर या निर्वासितांमुळे आसाम, त्रिपुरा वगळता अन्य राज्यात कोणताही परिणाम होण्याची शक्यता नाही. कारण नागालँड, मिझोरम आणि अरुणाचलमध्ये तर इनर लाईन परमिट शिवाय कोणीही जाऊ शकत नाही. अशा स्थितीत या राज्यांना कोणता धोका निर्माण होणार होता?




या विधेयकाला विरोध होण्याचे जे कारण सांगितले गेले ते असे, की या विधेयकाच्या आडून भाजप आपला हिंदुत्वाचा, हिंदू राष्ट्राचा अजेंडा पुढे करीत आहे. नागालँड, मिझोरम आणि मेघालय ही राज्ये उघडउघड ख्रिस्तीधर्मीय राज्ये म्हणून घोषित केली गेली आहेत. सध्याच्या आंदोलनात चर्चने काही ठिकाणी पडद्याआडून तर काही ठिकाणी उघडउघड भूमिका घेतली होती. मिझोरममधील निदर्शनात तर चर्च संचलित शाळांतील मुलांना निदर्शनात सहभागी होण्यास भाग पाडण्यात आले. अशा स्थितीत या विधेयकाला धार्मिक कारण देऊन विरोध व्हावा हे दुटप्पीपणाचे लक्षण आहे.

खरंतर याही राज्यांना आसामप्रमाणेच बांग्लादेशी घुसखोरीचा सामना करावा लागत आहे. येत्या दशकातच हा प्रश्न या राज्यांसाठी उग्र समस्या निर्माण करणारा ठरणार आहे. परंतु याबाबतीत ही सर्व राज्ये मौन बाळगून आहेत आणि विरोध मात्र केला जाता आहे तो बंगाली हिंदू निर्वासितांना. हिंदू निर्वासिंताना न्याय देण्यास आमचा पक्ष वचनबध्द आहे आणि पुढच्या निवडणुकीत लोकसभेत आणि राज्यसभेत बहुमत मिळवून आम्ही हे विधेयक मंजूर करुन घेऊ असा ठाम विश्वास भाजपाने व्यक्त केला आहे ही जमेची बाजू.

कोणताही विषय हाताळताना प्रत्येक राजकीय पक्षाला मतांचे गणित जुळवावेच लागते. त्याबाबत काही राजकीय निरिक्षकांचे मत असे आहे की पश्चिम बंगालमधील लोकसभेच्या जागा लक्षात घेता, ४५ तिथे मुसंडी मारुन सर्वाधिक जागा मिळवणारा पक्ष म्हणून स्थान निर्माण करण्यासाठी भाजपला या विधेयकाचा (जरी ते मंजूर होऊ शकले नसले तरीही) फायदा होईल आणि ईशान्येतील जागांची संभाव्य घट भरुन काढता येईल.

येत्या लोकसभा निवडणुकीत विरोधात गेलेले ईशान्येतील जनमत स्वत:च्या बाजूने वळवण्यात भाजप कितपत यशस्वी होतो हा कळीचा मुद्दा असेल. ●

विशेष लेख

# उजळमाथ्याने वावरणारे गद्दार आपण यांच्यावर बहिष्कार कधी टाकणार ?

- नरेंद्र प्रभू
९९८७००३६९०

## NDTV सारख्या प्रसारमाध्यमांचा निषेध व्हायला हवा

पुलवामा येथील दहशतवादी हल्ल्यानंतर सर्वत्र या हल्ल्याचा निषेध होत असताना एनडीटीव्हीच्या वरिष्ठ महिला संपादक निधी सेठी हिने आपल्या व्यक्तिगत फेसबुक अकाऊंटवरुन शहीद जवानांची खिल्ली उडवली. "५६ इंचाच्या तुलनेत ४४ भारी पडले" अशा आशयाचं ट्विट करत सेठी हिने #HowsThe Jaish असा हॅशटॅग ही वापरला. दहशतवाद्यांना पाठिंबा दर्शविणारा हॅशटॅग म्हणून #HowsThe Jaish या हॅशटॅगकडे पाहिले जाते.

तिची पोस्ट काही वेळातच व्हायरल झाली आणि सोशल मिडिया युजर्सनी तिला चांगलंच धारेवर धरलं. नेटकऱ्यांनी निधी सेठी हिला तिच्या वादग्रस्त पोस्टचा जाब विचारत चांगलेच झापले. मोठ्या प्रमाणात निधी सेठी हिला ट्रोल करण्यात आलं. हा प्रकार लक्षात आल्यानंतर एनडीटीव्हीने कारवाई करत निधी सेठी हिला दोन आठवड्यांसाठी निलंबित केलं.

भारतात राहून, या देशाचं खाऊन इथल्या पैश्यावर मौजमजा मारुन असा देशविघातक विषारी विचार ज्यांच्या नसानसात भिनला आहे त्या नालायक पत्रकारांचा आणि त्याना पाठीशी घालणाऱ्या NDTV सारख्या प्रसारमाध्यमांचा जाहीर निषेध झाला पाहिजे आणि समस्त भारतीयांनी त्यांच्यावर निदान बहिष्कार तरी घातला पाहिजे.

■ ■ ■

आपल्या कर्तव्यात लहानसहान बाबतीत कसूर करणारेच; सरकार, गुप्तचर, सुरक्षा दलांना नित्यनेमाने सवाल विचारु लागतात, तेव्हा आधीच जीव धोक्यात घालून राखण करणाऱ्यांचे लक्ष किती विचलित होत असेल ? त्यांचे विचलित लक्ष वा गोंधळलेपणा पाकिस्तानच्या दहशतवादी संस्था संघटनांसाठी सर्वात मोठी मदत असते. चकमकीत गुंतलेल्या लष्कराच्या जवानांना मागून धोंडे मारुन विचलीत करणारे हुर्रीयतचे भाडोत्री निदर्शक आणि उठल्यासुटल्या सुरक्षा यंत्रणांवर प्रश्नांचा भडीमार करणाऱ्यांमध्ये नेमका कोणता गुणात्मक फरक असतो ?

■ ■ ■

## उजळ माथ्याने वावरणाऱ्या गद्दारांचं काय करायचं ?

हा काश्मिरी तरुणाने केलेला हल्ला आहे आणि काश्मिरातील तरुण अशाप्रकारे दहशतवादाकडे वळत असल्याला भारत सरकारचे धोरण व तिथली लष्करी कारवाईच जबाबदार असल्याचा दावा प्रशांत भूषण यांनी केलेला आहे. त्यांनी काश्मिर पाकिस्तानला देऊन टाकावे, अशी सूचना यापूर्वी अनेकदा मांडलेली आहे आणि अशा जिहादी दहशतवादी घातपातानंतर त्यातल्या संशयितांना वाचवण्यासाठी भूषण यांच्यासारखे वकील नेहमीच पुढे आलेले आहेत. भारतीय संसद भवनावरच्या हल्ल्यात अफजल गुरु दोषी ठरलेला असताना त्याच्याही समर्थनाला भूषण व तत्सम

अनेकजण समोर आलेला आहेत. पण त्याच्याही पुढे जाऊन त्याच्या फाशीचा निषेध करणाऱ्या या लोकांनी वारंवार सहभाग घेतलेला आहे. अशा एका सोहळ्याचे आयोजन नेहरु विद्यापीठात झाले, तेव्हा अफजल गुरुचे समर्थन व भारताचे तुकडे करण्याच्या डरकाळ्या फोडल्या गेल्यावर काहूर माजले. तर घोषणा देणाऱ्यांच्या समर्थनाला राहुल गांधींसह केजरीवालही जाऊन पोहोचले होते. हे कसे विसरता येईल?)

### वैचाारिक दगडफेक करणारे अधिक धोकादायक

आपल्या जागी आपले काम वा कर्तव्यही ज्यांना धड बजावता येत नाही, हे लोक आज शिरजोर झालेत. ही आपल्याला घातपातापेक्षाही अधिक भेडसावणारी समस्या झालेली आहे. “गुप्तचर खाते झोपलेले होते काय?” असलेही सवाल सरकारला हे विचारत असतात. बंगालमध्ये सीबीआयला आपली कारवाई करण्यापासून रोखण्यासाठी अधिकाऱ्यांना अटक करण्यापर्यंत मजल मारणाऱ्या ममता आता त्याच थाटात गुप्तचर व सुरक्षा सल्लागार काय करीत होते? असा सवाल करीत आहेत. मात्र आपल्या हाती जो अधिकार वा स्वातंत्र्य आलेले आहे, त्याचा जबाबदारीने वापर करण्याचे सौजन्यही त्यांच्यापाशी कधी आढळून येत नाही.

आपल्या कर्तव्यात लहानसहान बाबतीत कसूर करणारेच; सरकार, गुप्तचर, सुरक्षा दलांना नित्यनेमाने सवाल विचारु लागतात, तेव्हा आधीच जीव धोक्यात घालून राखण करणाऱ्यांचे लक्ष किती विचलित होत असेल? त्यांचे विचलित लक्ष वा गोंधळलेपणा पाकिस्तानच्या दहशतवादी संस्था संघटनांसाठी सर्वात मोठी मदत असते. चकमकीत गुंतलेल्या लष्कराच्या जवानांना मागून धोंडे मारुन विचलीत करणारे हुर्रीयतचे भाडोत्री निदर्शक आणि उठल्यासुटल्या सुरक्षा यंत्रणांवर प्रश्नांचा भडीमार करणाऱ्यांमध्ये नेमका कोणता गुणात्मक फरक असतो? ही सुरक्षादलावर केलेली वैचारिक दगडफेक नव्हे का? पाकिस्तान कुणा कश्मिरी वा भारतीय बहकलेल्या मुस्लिम तरुणाला केवळ घातपाताचे प्रशिक्षण व हत्यारे पुरवित असते. पण त्यांनी तशी हिंसा वा घातपात घडवण्यासाठी पोषक गोंधळाची परिस्थिती पाकिस्तान निर्माण करु शकत नाही. तशी स्थिती इथेच कोणी तरी निर्माण करावी लागते, जिचा लाभ असे दहशतवादी उठवू शकत असतात. असे गद्दार आपल्यातच उजळमाथ्याने वावरत नाहीत काय?

### उजळमाथ्याने वावरणाऱ्या गद्दारांचा बंदोबस्त आपण करु शकतो

अशा सिध्दू वा प्रशांत भूषणवर आता टिकेची झोड उठलेली आहे. पण ४० जवानांच्या मारेकऱ्यांना अशी परिस्थिती निर्माण करुन देणाऱ्यांना प्रतिष्ठेने आपण वागवत आहोत, त्याचे काय? दहशतवादी कुठून पैदा होत असतो? तो आईच्या उदरातून थेट जिहादी म्हणून जन्म घेत नसतो. तर आसपासच्या वातावरणातून त्याची जडणघडण होत असते. काश्मिरात हजारो मुस्लिम तरुण आहेत. त्या प्रत्येकाने हाती बंदूक घेतलेली नाही की स्फोटकांचे प्रशिक्षण घेण्यासाठी पाकिस्तानला प्रयाण केलेले नाही. जे मूठभर त्या दिशेने वळतात, त्यांना तिकडे ढकलण्याचे काम फक्त हुर्रीयतवाले करीत नाहीत. तर त्यांच्या अशा उचापतींना राजकीय सामाजिक प्रतिष्ठा व मुभा देण्याचे पाप करणारे जथ्थे इथेच बोकाळलेले आहेत. त्यातून दहशतवादी उपजत असतात. अरूंधती रॉय, प्रशांत भूषण, केजरीवाल किंवा राहुल गांधी, कन्हैय्याकुमार त्यांच्या समर्थनाला जातात, तेव्हा प्रत्यक्षात संसदेवर घातपाती हल्ल्याला प्रतिष्ठा मिळवून देत असतात. ●

कोणी अफजल  गुरुच्या फाशीच्या विरोधातमानवाधिकाराचागळाकाढणाराअग्रलेख लिहितो, तेव्हा आदिल दार सारख्या हलकटांना अफजल गुरु आदर्श वाटत असतो आणि त्याला पाकिस्तानात जाऊन जिहादी फिदायीन होण्याचे डोहाळे लागत असतात. थोडक्यात पाकिस्तानला भारताच्या विरोधात हिंसाचार घडवण्यासाठी जी तरुणांची भरती करायची असते, तिला प्रोत्साहन देणारे आपल्यातच दबा धरुन बसले आहेत.

शरद पवार, जितेंद्र आव्हाडसारखे कधी नयनताराच्या नावाने आक्रोश करताना दिसतील, तर कधी भारताचे तुकडे पाडण्याच्या डरकाळ्यांना अविष्कार स्वातंत्र्य ठरवण्यासाठी आपली सर्व बुध्दी पणाला लावताना दिसतील. त्यांचा बंदोबस्त सुरक्षा सैनिक, गुप्तचर वा पोलिस सरकार करु शकत नाही. ती जबाबदारी आपण सामान्य नागरिकांची असते. आज टाहो फोडणारे आपण ती कितीशी पार पाडत असतो?  आपण काय करु शकतो? हाच प्रश्न मनात आला ना?

याचा अर्थ इतकाच, की आपल्यातच उजळमाथ्याने वावरणाऱ्या अशा गद्दार फितुर लोकांविषयी आपण गंभीर नसू; तर आपण देशाच्या सुरक्षेविषयी उगाच आक्रोश करण्यात काहीही अर्थ नाही. त्यालाही देखावाच म्हणावा लागेल. आपल्याला कोणी काश्मिरात जाऊन हुर्रीयत किंवा दहशतवाद्यांचा बंदोबस्त करायला सांगितले नाही. पण त्यांच्यासारख्या जिहादींना भारतीय सेनादलाच्या विरोधात हिंसा माजवायला प्रोत्साहन व हिंमत देणाऱ्या कन्हैय्याकुमार किंवा उममर खालीद यांच्या पाठीशी उभे रहाणाऱ्यांचा बंदोबस्त तुम्ही आम्ही नित्य जीवनात करु शकतो ना? त्यासाठी आपल्यालाही हाती बंदूक वा बॉंब घेण्याची काही गरज नाही. आपल्या साध्या सरळ वागण्यातून वा कृतीतून अशा प्रवृत्तीचा बंदोबस्त करणे शक्य आहे.

अगदी छोट्या छोट्या कृतीतून अशा देशद्रोह्यांचा बंदोबस्त आपण करु शकतो. आज जो उठतो, तो भारत सरकारला वा भारतीय लष्कराला पाकिस्तानला धडा शिकवा, म्हणून घोषणा देत रस्तोरस्ती फिरताना दिसतो आहे. पण दुसऱ्याने काय करावे हे सांगताना आपल्याला काय करणे शक्य आहे, त्याचा साधा विचारही आपल्या मनाला शिवलेला नाही. सैनिकांनी वा सरकारने काय करावे याची माहिती आपल्याला पक्की आहे. पण आपल्या जागी आपण खूप काही करु शकतो. कुठलाही कायदा न मोडता खूप काही करु शकतो, त्याचा आपल्याला पूर्णपणे विसर पडला आहे. आपल्याला बंदूक बॉंब ही हत्यारे वाटू लागली आहेत. पण आपल्यापाशी असलेले स्वातंत्र्य व अधिकार देखील अधिक भेदक हत्यारे असल्याचे भान सुध्दा आपल्याला राहू शकलेले नाही. म्हणून आपण पटकन म्हणतो. आम्ही सामान्य माणसे काय करु शकतो? मित्रांनो करायचे असेल तर आपण खूप काही करु शकतो.

निराश - वैफल्यग्रस्त मुस्लिम तरुण घडवण्याचे काम सिध्दू - भूषण किंवा कन्हैयाचे समर्थन राहुल, केजरीवाल मंडळी करीत असतील तर या पुरोगामी दहशतवाद्यांचा बंदोबस्त कायदा व सरकार करु शकत नाही. पण आपण नक्की करु शकतो.  हे अस्तनीतले निखारे आताच झटकून टाकले पाहिजेत. दिसायला किरकोळ गोष्ट आहे. आपल्याला जमणार आहे का? अशाना बहिष्कृत करणे शक्य नसेल तर उगाच धडा शिकवण्याच्या डरकाळ्या नकोत आणि सरकारला कारवाई करण्याचे सल्लेही द्यायला नकोत. रोजच्या जगण्यात कोंबडी-बकरीसारखे जगावे आणि आपला नंबर लागला की निमूट मरावे. ●

# नागालँडमध्ये संघ-भाजप विरोधात विषारी प्रचार व्हिडिओ क्लीप व्हायरल

- संजय काठे, ९९६९२१६१७९
महाराष्ट्र प्रांत पूर्वांचल विभाग प्रमुख

सध्या नागालँडमध्ये संघ आणि भाजप विरोधात धादांत खोटे आणि भयंकर आरोप करणारी क्लीप व्हायरल करण्यात आली आहे. त्यात सुरूवातीलाच "कम्युनल भाजपला सत्तेवरुन फेकून द्या." असे आवाहन करण्यात आले आहे. त्यामुळी ही क्लीप कशासाठी व्हायरल केली गेली आहे हे सहज कळण्यासारखे आहे. बाब इतकीच असती तर गोष्ट वेगळी ! पण पुढे जाऊन संघ आणि संघ संबंधीत संस्थांकडून नागालँडमध्ये चर्च जाळली जाताहेत; चर्चवर हल्ले होत आहेत. नन्सवर रेप करण्यात येत आहेत. मोठ्या प्रमाणात धर्मांतरे करण्यात येत आहेत. सत्तेच्या माध्यमातून नागालँडमध्ये हिंदूकरण करण्याचा सत्ताधारी बीजेपीचा डाव आहे. असा भयंकर विषारी प्रचार करण्यात आला आहे. हे सरकार अँटी ख्रिश्चन आहे असं वारंवार सांगण्यात आलं आहे.

दुक-श्राव्य माध्यम हे इतकं प्रभावी आहे की इतक्या धादांत खोट्या आणि चिथावणीखोर अपप्रचाराला नागालँडमधील दुर्गमभागातील काय किंवा शहरी भागातील काय नागा जनता बळी पडण्याची शक्यता आहे. मुळात - चर्च सांगेल ती पूर्वदिशा अशी स्थिती असलेल्या या भागात या अपप्रचाराचा दुष्परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. सिटीझनशिप अॅमेंडमेंट बिलाला विरोध करण्यासाठी चर्चने मिझोरममध्ये उघडउघड भूमिका घेतली होती यावरुन आणि या व्हीडिओ क्लीप वरुन एकच सिध्द होतंय, की येत्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ईशान्येतील विशेषत: ख्रिस्ती राज्यातील जनतेला भाजपविरोधात भडकवण्याचे प्रयत्न चर्च वारंवार करणार आहे. कारण केंद्रात भाजप सत्तेवर आल्यास आपला प्रभाव घटण्याचा धोका चर्चला वाटतो.

■ ■ ■

*वरील प्रकारच्या अपप्रचाराला उत्तर देणे म्हणजे पूर्वांचल वसतिगृहांचे काम अधिक जोमाने करणे. विद्यार्थ्यांची आणि वसतिगृहांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढवणे. कारण याच कामातून नागालँडमधील जनमत घडवणारी भावी पिढी आपण निर्माण करु शकू. या कामाचा परिणाम आता जाणवू लागला आहे. परंतु तो दृष्य स्वरुपात येण्यास वेळ द्यावा लागेल.*

■ ■ ■

२०१४ साली नरेंद्र मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून हजारो खोट्या, बनावट एनजीओचं कामकाज बंद करण्यात आलं आहे. या एनजीओच्या माध्यमातून चर्चकडे पैशांचा प्रचंड ओघ परदेशातून येत होता. तो बंद झाला आहे. त्यामुळे अर्थातच भ्रष्टाचारकरुन पैसा खाणं आणि धर्मांतरणासाठी त्याचा वापर करणं यावर पायबंद बसला आहे. या व्हीडिओ क्लीप मध्ये संघ आणि संघाच्या अन्य संस्था असा शब्दप्रयोग वापरण्यात आला आहे. यावरुन हेच सिध्द होतं की संघाचं काम वाढण्यात आपल्याला धोका आहे याची पूर्ण जाणीव चर्चला झालेली आहे. याचा दुसरा

## खासी भाषेतील कुराणाचे प्रकाशन मुस्लिमांच्या कारवायांकडे डोळेझाक महागात पडेल

फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात मेघालयाची राजधानी शिलाँग येथे खासी भाषेत भाषांतरित केलेल्या कुराणाचे धुमधडाक्यात प्रकाशन झाले. मी त्यावेळी शिलाँगमध्येच होतो. या खासी भाषेतील कुराणासंदर्भात कोणतीही प्रतिक्रिया अभावानेसुध्दा उमटली नाही. याचे मोठे आश्चर्य वाटले. काही गावातून संघ स्वयंसेवकांनी संचलने काढली तर सारे मिशनरी आणि आमचे सहकारी म्हणवणारे स्थानिक देखील संघावर तुटून पडले. खासी पहाडात आज सुमारे सत्तर टक्के धर्मांतरीत इसाइ आहेत. इस्लामचा धोका त्यांनाही आहे, नव्हे! त्यांनाच जास्त आहे पण ते गप्प बसलेत. त्यांना भीती वाटते ती केवळ संघाची.

खासी मुली, महीला आज मोठ्या प्रमाणावर मुस्लिम तरुणांसोबत लग्न करत आहेत. त्यामुळे मुसलमानांची संख्या वाढत आहे. परंतु कुणालाही त्याची चिंता नाही. अशाच दुर्लक्षातून कोकराझारची घटना या मेघालयाजवळच असममध्ये घडलेली आपण साऱ्यांनी अलीकडच्याच काळात अनुभवलेली आहे, तरी देखील आम्ही जागे होणार नसू तर आम्हाला कोण वाचविणार ? ईशान्येत मिशनऱ्यांनी संघाचे काल्पनिक भूत निर्माण केले आहे. आणि संघाच्या विरोधात भोळ्याभाबड्या ईशान्येतील जनतेला उभे करीत आहेत. आणि मुसलमानांच्या हलचालीकडे मात्र डोळेझाक करीत आहेत. याचा मोठा फटका भविष्यात बसेल तेव्हाच त्यांचे डोळे उघडतील पण तेव्हा उशीर झालेला असेल.

अर्थ असा की सेवाकार्याच्या माध्यमातून ईशान्येत सुरु असलेली आपली कामं प्रभावी ठरत आहेत; वरील प्रकारच्या अपप्रचाराला उत्तर देणे म्हणजे पूर्वांचल वसतिगृहांचे काम अधिक जोमाने करणे. विद्यार्थ्यांची आणि वसतिगृहांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढवणे. कारण याच कामातून नागालँडमधील जनमत घडवणारी भावी पिढी आपण निर्माण करु शकू. या कामाचा परिणाम आता जाणवू लागला आहे. परंतु तो दृष्य स्वरुपात येण्यास वेळ द्यावा लागेल.


त्याचप्रमाणे ईशान्यभारतातील व महाराष्ट्रातील आपल्या कामाची प्रसिध्दी करणारे ईशान्य वार्तासारखे प्रसार माध्यम अधिकाधिक घरांपर्यंत पोहचवणे ही सुध्दा आजच्या काळाची एक महत्त्वाची आवश्यकता आहे. म्हणून आळस झटकून आपली पूर्वांचल संबंधीची विविध कामं अधिक प्रभावी कशी ठरतील याचा प्रत्येकाने विचार आणि त्याप्रमाणे कृती करणं हेच अशा विषारी प्रचाराला कायमस्वरुपी उत्तर आहे. ●

# अगरबत्तीची मूळकथा

- दयानंद सावंत
९८६९६१९७०४

पाच ते सहा वर्षे या झाडाची वाढ झाल्यावर एका विशिष्ट संकरणामुळे झाडाच्या मध्य भागातून वरच्या दिशेने सरळ नैसर्गिक बुरशी लागण्यास सुरुवात होते. कालांतराने बुरशी लागलेला आतील भाग काळवंडला जातो. साधारण दहा वर्षापर्यंतचे झाड उत्पादन घेण्यास योग्य होते व त्यानंतर हे काळवंडलेले आतील लाकूड प्रक्रिया करण्याच्या योग्यतेचे होते. पारंपारिक पध्दतीने तांब्याच्या तसेच लोखंडाच्या भांड्यातून प्रक्रियाकरुन तेल काढण्याच्या विविध पध्दती आहेत. आता काही आधुनिक पदध्दती देखील आल्या आहेतच. परंतु प्रत्येक पध्दतीतून काढलेल्या तेलाची आपापली स्वतंत्र गुणवत्ता असते. हा एक जलद-वाढणारा, पुरातन, उष्ण कटिबंधातील जंगली वृक्ष आहे. सुरुवातीला याच्या लहान रोपांना सावली व मुबलक प्रमाणात पाण्याची नितांत गरज भासते. अशा वातावरणात या झाडाची वाढ जोमाने होते.

जंगलातील "अगर" च्या अवैध तोडीमुळे याची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. अगर वृक्ष तोडण्यावर आसाममध्ये बंदी आहे. परंतु येथील होजाई या एका तालुक्यात अंदाजे तीन हजाराहून अधिक अगर वृक्षाच्या वर प्रक्रिया करण्याचे कारखाने सुरु आहेत.




■ ■ ■

*महाराष्ट्रातील तरुणांना या विषयात अधिक माहिती देण्यासाठी Newway संस्थेने पुढाकार घेतला आहे. "अगर" भारताच्या ईशान्य राज्यातील जनजातींसाठी आर्थिक सक्षमीकरणाचे एक उत्तम स्त्रोत आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीत अगर वृक्ष लावून हिरव्या आर्थिक क्रांतीच्या वाटा देशातील नागरिकांच्या हातात ठेवण्याचा विचार पुढे आला पाहिजे. अगर वृक्षारोपण अभियान हवामानातील बदल आणि प्रदूषण नियंत्रणाचे मोलाचे कार्य करु शकते.*

■ ■ ■

चहाच्या मळ्यात ही याची मुबलक प्रमाणात झाडे आहेत. एनआरसी कायद्यापासून धोका असलेल्या अनेकांकडून चहाच्या मळ्यात काम करुन घेताना, सुसूत्र पध्दतीने संबंधित लाकूड गोळा करुन घेतले जाते.

व्हिएतनाम आणि अन्य देशातील या झाडांच्या प्रजाती जवळजवळ नष्ट होऊ लागल्या आहेत. व्हिएतनाममध्ये एक्झिलिरिया क्रॅास्ना या प्रजातीला संरक्षित करण्यात आले आहे. आपल्या देशातील जंगलातील या झाडांच्या तोडण्यावर उपाय आणि अंमलबजावणी विकसित केल्यास, अवैधरीत्या होणाऱ्या व्यापार आणि वृक्षतोडीला प्रतिबंध करणे शक्य होईल. याचबरोबर अगरच्या संवर्धनाच्या व वाढीच्या दृष्टीने प्रासंगिक आणि दीर्घकालीन योजनेमध्ये, प्रामुख्याने वणवा लागणे इत्यादी सारख्या समस्यांवर, तसेच लहान झाड

जगविण्याच्या दृष्टीने, विविधता राखण्यासाठी तसेच राळ उत्पादनात सुधारणा करण्यासाठी पारंपारिक पध्दती जोपासण्याची आवश्यकता आहे.

आसाम सरकारच्या वनखात्याच्या गणनेनुसार सन २००३/२००४ मध्ये ९०,००,००० हून जास्त अगरची झाडे असल्याची मोजणी झाली आहे. एकूण ९००० पेक्षा जास्त अगरचे तेल काढण्याचे कारखाने असममध्ये आहेत. ७,००,००० पेक्षा जास्त झाडे आसाममध्ये शेतकऱ्यांकडून कारखान्यांना पुरवली गेली. ५०,००० ते १,००,०००० च्या आसपास कामगारांना व शेतकऱ्यांना यापासून थेट वा द्वारा रोजगार मिळाला आहे. संस्थापक अधिवक्ता बिकास बोरा यांनी त्यांच्या राहत्या गावापासूनच या कार्याला सुरुवात केली. अगरच्या रोपवाटिका सुरु करुन आसामच्या संपूर्ण हरित क्रांती मध्ये सहभाग घेऊन शेतकऱ्यांना प्रक्रियेचे प्रशिक्षण देणे, त्यांनी केलेल्या उत्पादनाला बाजारपेठ मिळवून देण्याचा प्रयत्न करणे, सरकारने या विषयात शेतकऱ्यांच्या प्रगतीच्या हेतूनं नीती आखण्यास पत्रव्यवहार करणे इत्यादीच्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. या Newway संस्थेच्या माध्यमातून सर्वोतोपरी सहकार्य सुरु आहेच.

उर्वरित भारतात स्थानिक स्तरावर अगर च्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी विविध क्षेत्रात संपर्क करीत आहे. कोकणामध्ये सुध्दा आसामसारखे अगरला पोषक असे वातावरण आहे. काही जणांनी याच्या लागवडीसाठी प्रयत्न केल्याचे ऐकिवात आहे. महाराष्ट्रातील तरुणांना या विषयात अधिक माहिती देण्यासाठी Newway संस्थेने पुढाकार घेतला आहे. “अगर” भारताच्या ईशान्य राज्यातील जनजातींसाठी आर्थिक सक्षमीकरणाचे एक उत्तम स्त्रोत आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीत अगर वृक्ष लावून हिरव्या आर्थिक क्रांतीच्या वाटा देशातील नागरिकांच्या हातात ठेवण्याचा विचार पुढे आला पाहिजे. अगर वृक्षारोपण अभियान हवामानातील बदल आणि प्रदूषण नियंत्रणाचे मोलाचे कार्य करु शकते.

पावसासाठी अनुकूल वातावरण तयार करण्यासोबत, निरोगी पर्यावरणाची स्थिरता सुध्दा सांभाळण्याची क्षमता अगरवृक्षांमधे आहे. ईशान्य भारतातील ग्रामीण भागात हिरव्या अर्थशास्त्राच्या पुनरुत्थानाच्या काळात अगर उत्पादन हे एक गतिशील माध्यम आहे. या शेतकी उत्पादनात व प्रक्रियेत सहभागी आणि क्षमता असलेल्या वनवासी बांधवांना अजून सक्षम करून त्यांचे दारिद्र्य कमी करण्यास अगर नीती मैलाचा दगड होऊ शकते. ●





# निनगोल चकौबा

## माहेरवाशिणींचं कोडकौतुक करणारा मणिपुरी सण

- डॉ. स्वाती गाडगीळ, ९८२०१००५४१

माहेर हा एक शब्द नसून, अख्खा शब्दकोश आहे असं म्हटलं तर नक्कीच अतिशयोक्ती ठरणार नाही! प्रत्येक मुलीच्या मनात तिचे आई-बाबा-बहीण-भाऊ-वहिनी आणि माहेरची सगळी माणसं ह्यांचं एक सुंदर विश्व असतं. अगदी पुराणातल्या कथांमध्ये जिथे जिथे माहेराचा उल्लेख झालाय ते सगळे क्षण हळवे होते आणि आज एकविसाव्या शतकात सुध्दा मी असंच म्हणू शकते की मुलींचा माहेराशी असलेल्या नात्याचा गोड गुंता न सोडवलेलाच बरा असतो!

त्या नात्यात ओढ असते, काळजी असते, प्रेम असतं, तसंच रुसवे फुगवे देखील असतात. कधी ते प्रेम आईने केलेल्या लाडू, वड्यांमध्ये बांधलं जातं तर कधी वडिलांनी तोंड भरुन दिलेल्या आशीर्वादात पाझरतं. कधी वहिनीने भरलेल्या ओटीमध्ये भरुन पावतं, तर कधी डोळ्यांच्या ओल्या कडा पुसणाऱ्या भावाच्या ठसकेदार मिशांमधून सांडतं! भाचरांच्या हसण्या खेळण्यातून अजून घट्ट होत जातं.

अशा या माहेराचं प्रत्येक मुलीच्या आयुष्यात एक खास स्थान असतं. अशा समयी, १९६५ साली भालजी पेंढारकरांनी निर्माण केलेली एक अजरामर कलाकृती, एक सर्वोत्कृष्ट सिनेमा "साधी माणसं" आठवला नाही तरंच नवल! आणि तो कशासाठी तर त्यातल्या मळ्याच्या मळ्यामंदी पाटाच पाणी जातं या गीतासाठी!

सावळा बंधुराया, साजिरी वयनीबाई
गोजिरी शिरपा हंसा म्हायेरी माझ्या हाय
वाटंनं म्हयेराच्या धावत मन जातं
गुलाब, जाई-जुई, मोगरा, फुलवीतं...

या ओळींची आज इतक्या वर्षांनी सुध्दा भुरळ पडते.

■ ■ ■

*"लग्न झाल्यावर मुलगी माहेरी परकी होते", असा विचार कुणाच्या मनात येणं, हा सुध्दा कायद्याने गुन्हा ठरवावा आणि "निनगोला चकौबा" सारखे सण सगळ्या जाती जमातींमध्ये सक्तीचे करावे. प्रत्येक आई-बापाने आपल्या मुलीला लग्नानंतरही तेवढंच प्रेम द्यावं आणि तिच्यावरचा आपला प्रेमाचा अधिकार व हक्क आता संपला असं मानू नये. प्रत्येक मुलीचं "मापम" अर्थात माहेर आयुष्यभर तिच्या सोबतीला असावं, एवढीच भाबडी इच्छा!*

■ ■ ■

जसं गौरी गणपतीला महाराष्ट्राच्या लेकी माहेरी जातात, दुर्गा पुजेच्या निमित्ताने बंगालच्या लेकी माहेरी जातात आणि चाकरमान्यांच्या मुंबईच्या मुली दर उन्हाळ्याच्या सुट्टीत मुलांना घेऊन माहेरी जातात अगदी तसाच सुंदर, गोंडस लोभस अशी कितीही विशेषणं लावावी असाच एक सण मणिपूरमध्ये आहे. मैतै जमातीचे लोक आणि अन्य काही जमातीत देखील "निनगोल चकौबा" हा सण साजरा होतो.

मुलींना माहेरी येण्याचं रीतसर आमंत्रण दिलं जातं. मुलीचा भाऊ तिच्या सासरी जाऊन, बहिणीला व भाच्यांना माहेरी पाठवण्यास विनंती करतो. मग तिच्यासाठी खास भोजनाची तयारी केली जाते. दोन्ही घरात आनंदी आनंद असतो. तिची मुलं, आजी, आजोबा, मामा व माहेरच्या वाटेची ओढ असेलेले "निनगोल" म्हणजे "कन्या" आनंदात असतात.

"चकौबा" म्हणजे खास भोजनाचा दिवस. हा दिवस नोव्हेंबर महिन्यात येतो. तर कधी हा दिवस ऑक्टोबर मध्ये येतो. मणिपूरच्या हियांगी महिन्यात, अमावस्येनंतरचा दुसरा दिवस असतो. "इंचांग माथेन माथेन", म्हणजेच निरनिराळ्या पदार्थांची रेलचेल असलेला, हा तिच्या मापम म्हणजेच माहेरचा कौटुंबिक भोजनसोहळा असतो. जिव्हाळ्याचा क्षण, मुलीच्या माहेरी येण्याचा सोहळा.. मुलगी उंची वस्त्र नेसून, दागदागिने घालून फळं व मिठाई घेऊन मापम ला येते. "कबोक कौइदुम", रसगुल्ले, समोसे, कचोऱ्या, सेव भुजिया हे पदार्थ मैतै जमातीच्या लोकांच्या खास पसंतीचे आहेत. मुलीने आणलेल्या पदार्थाबरोबर फळं सुध्दा असतात आणि विशेष म्हणजे त्यात नारळाचे खास महत्त्व असते. आई-वडील आणि भाऊ, बहिणीला व तिच्या मुलांना भेटवस्तू देतात. जी कुटुंब मोठी असतात. तिथे "बामोन" म्हणजेच आचाऱ्याकडून स्वयंपाक करवला जातो. याला लग्नाच्या स्वागत समारंभाचं रुप येतं. सारंग मासा, खास या दिवशी जेवणाच्या मेन्यूमध्ये असतोच. अतिशय महाग असला तरी या दिवशी माहेरवाशीणींसाठी हा आवर्जून बनवला जातो.



महागातले मासे बहिणीसाठी नेताना भावाच्या चेहऱ्यावरचं समाधान, तर भरभरुन आशीर्वाद द्यायला व नातवंडांचे लाड करायला उतावीळ असलेले बोबोक आणि पुपु! पारंपारिक वेषभूषा, नवे कापडे, आवडते खाद्य पदार्थ आणि जिव्हाळ्याने ओतप्रोत भरलेला हा सोहळा, मनात भरतो!

असं प्रेम जर मुलींना वर्षभर मिळत राहिलं, जसं माहेरी तसंच सासरी देखील मिळालं, तरच खऱ्या अर्थाने हा सण साजरा झाला असं मी म्हणेन. आपले पूर्वज खरंच खूप हुशार होते. अनेक अशा चांगल्या गोष्टींना त्यांनी प्रथांचं रुप दिलं, त्याचे सणवार झाले, मैतै करतात म्हणून इतर जमातीतही साजरे होऊ लागले! इतक्या सोप्या रितीने मुलीचे आयुष्य सुखकर करण्याच्या पध्दती रुढ झाल्या. तरीही खंत वाटावी, जीवाला घोर लागावा अशा घटना सासुरवाशींणींच्या बाबतीत घडताना आपण बघतो, तेव्हा वाटतं की, "जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा," किंवा "आता ते घर तुझं आहे," किंवा "लग्न झाल्यावर मुलगी माहेरी परकी होते", असा विचार कुणाच्या मनात येणं, हा सुध्दा कायद्याने गुन्हा ठरवावा आणि "निनगोला चकौबा" सारखे सण सगळ्या जाती जमातींमध्ये सक्तीचे करावे. प्रत्येक आई बापाने आपल्या मुलीला लग्नानंतरही तेवढंच प्रेम द्यावं आणि तिच्यावरचा आपला प्रेमाचा अधिकार व हक्क आता संपला असं मानू नये. प्रत्येक मुलीचं "मापम" अर्थात माहेर आयुष्यभर तिच्या सोबतीला असावं, एवढीच भाबडी इच्छा! ■





# अरुणाचलातील पारंपारिक दागिने

अरुणाचल प्रदेश मधे २० पेक्षा अधिक जनजाती आहेत. त्यामुळे त्यांच्यात विविध प्रकारच्या दागिन्यांचा वापर असणे हे ओघाने आलेच. तरीही त्यांच्यात काही साम्येही आहेत. बहुतेक सर्व स्त्रिया माळा, बांगड्या आणि कंबरपट्टे वापरतात. शिरोभूषणे असणे ही सुध्दा सर्वत्र अढळणारी एक बाब आहे.



रंगीबेरंगी काचेचे तुकडे, खडे यांचा तर दागिन्यांमध्ये वापर होतोच,परंतु दक्षिण अरुणाचलमधे **तांबे आणि चांदी** यांपासून तयार केलेले दागिनेही वापरले जातात. अशा **मण्यांच्या माळा** केवळ स्त्रियाच वापरतात असे नव्हे तर काही प्रमाणात पुरुषही वापरतात. आदी जनजातीमधील स्त्रिया तांब्याच्या चपट्या गोलाकार चकत्या वेताच्या पट्टयावर / चामड्याच्या पट्टयावर वापरतात.





**खड्यांपासून बनवलेले** पट्टेही वापरत असतात. असे अनेक खडे वापरले जातात त्यांची किंमत त्यांच्या रंगावरुन ठरतो. तांब्याच्या बांगड्या सर्रास वापरल्या जातात मनगटापासून दंडापर्यंत. **नाण्यांपासून** तयार केलेल्या माळा वापरल्या जातात. आदी **शेल नेकलेस** अत्यंत मौल्यवान समजले जातात. म्हणून ते परंपरेने वापरले जातात. महिला अनेक **साखळ्या** जोडलेले चांदीचे पदक वापरतात.







# चिपळूणचे श्री. हेमंत भागवत यांना परमविशिष्ट सेवा पदक

## जनकल्याण समितीच्या वतीने अभिनंदन सोहळा

**- सौ. प्राजक्ता ओक**

**९०२८९७२०९६**

चिपळूणचे सुपुत्र श्री. हेमंत नारायण भागवत Retired AOA (Air Officer in Charge Adminsitration) ह्यांना ह्या वर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते परमविशिष्ट सेवा पदक जाहीर झाले आणि चिपळूणची मान पुन्हा एकदा स्वाभिमानाने उंचावली. ह्या आधी त्यांना अती विशिष्ट सेवा पदक व वायु सेना पदक देऊन सन्मानित केले गेले आहे. अतिशय साधेपणाने जगणारे व सगळ्यांमध्ये सहज मिसळणारे भागवत काका वसतिगृहास भेट देऊन गेले आणि अगदी घरचे सदस्य असल्यासारखे नाते निर्माण झाले. त्यांच्या ह्या यशाबद्दल जनकल्याण समितीने त्यांचे कौतुक करुन अभिनंदन केले. कुमारी लिंकुप्ला ए शतसंग हिने मुलींच्या वतीने एक भेटकार्ड दिले ज्यावर सगळ्या मुलींनी त्यांची स्वाक्षरी करुन भागवत सरांचे अभिनंदन केले.





**रीकूट रंकक्लेम, नाशिक वसतिगृह - उत्कृष्ट एम्ब्रॉयडरीसाठी बक्षीस**



डोंबिवली वसतीगृह, डोंबिवली जिमखान्यावर फूटबॉलची प्रॅक्टीस सोबत मधुकराव चक्रदेव




Naga Students from Pune Ishwar Puram paying respect by praying respect

# आसामी चित्रपट - "रेनबो फिल्डस्" ला सर्वोत्तम कथेचे पारितोषिक

आसामी भाषेतल्या "हॉईक्सो बोटे धेमा लिटे" म्हणजे "रेनबो फिल्डस्" या चित्रपटाला अमेरीकेतील चित्रपट महोत्सवात सर्वोत्तम कथेचे पारितोषिक मिळाले आहे. अमेरिकेतील पेनसिल्वानिया येथे पार पडलेल्या **एरी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात** हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच लॉस ॲनजेलीस येथे पार पडलेल्या **लव्ह आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात** सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार मिळाला.

सन १९८० मध्ये बांगला देशातून अवैधपणे आसामात स्थलांतरित होणाऱ्या लोकांच्या विरुध्द आसाममध्ये विद्यार्थ्यांचे हिंसक आंदोलन उसळलेले होते. ज्या भागात हे पराकोटीचे हिंसक आंदोलन




उसळले होते, त्या भागात राहणाऱ्या मुलांच्या मनावर या हिंसाचाराचा कसा परिणाम झाला याची कथा या चित्रपटात सांगण्यात आली आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शक विद्युत कोटोक्य हे त्यावेळी त्या भागातच रहात होते. अवैधपणे स्थलांतरित होणाऱ्या परदेशी माणसांविरुध्द आंदोलन छेडले जात असताना त्यांच्या बालमनावर त्या हिंसाचाराचे जे प्रतिसाद उमटले तेच जणू कथन करण्यासाठी त्यांनी या चित्रपटाची कथा उलगडली आहे.

**नियोर** नावाच्या लहान मुलाची कथा या चित्रपटात सांगण्यात आली आहे. दिग्दर्शकाने आपल्या भूतकाळात डोकावून त्याच्या लहानपणी घडलेल्या दुर्देवी हिंसाचारांच्या घटनांचा शोध घेतला आहे.

निसर्गरम्य अशा ब्रह्मपुत्र नदीच्या खोऱ्यातील एका खेड्याच्या पार्श्वभूमीवर चित्रित केलेल्या या



चित्रपटात दिग्दर्शक आपल्याला नियोरच्या रम्य बालपणात घेऊन जातो. नियोर आणि त्याचे बालमित्र या खेड्यात आपले नित्याचे जीवन जगत असतांना, आजूबाजूच्या प्रदेशात मात्र अशांत वातावरण पसरलेले असते. सन १९८३ मध्ये आसामातल्या नेल्ली येथे जे हत्याकांड झाले होते त्यांत सुमारे २००० संशयित स्थलांतरितांना ठार मारण्यात आले होते. हे पाशवी कृत्य ज्या लहान मुलांनी पाहिले, त्यांच्या मनावर नंतर जो परिणाम दिसून आला त्याचे चित्रीकरण या चित्रपटात करण्यात आले आहे. हत्येनंतर चाळीसहून अधिक मृत शरीरे ब्रह्मपुत्रेच्या पात्रात तरंगतांना दाखविण्यात आली आहेत.

हिंसाचाराच्या घटना पाहून नियोरची धाकटी बहीण कुवाली हिची तर वाचाच गेली. नियोरच्या सुप्त मनावर त्याचा परिणाम झाला. लोकांना जिवंतपणी जाळण्यात येत होते. फुगलेली प्रेते ब्रह्मपुत्रेच्या पाण्यावर तरंगत होती. हे पाहून तरुण व बालमनावर उमटलेला ओरखडा आयुष्यभर पुसणे शक्य नाही.

हे आजोबा रंगमंचावरचे होते व लोक खोटं-खोटं मरतांना दाखविलेले होते. आजोबा रंगमंचावरचे कसेलेल नट असल्याने कुवालीला समजावण्याचे नाटक ते उत्तम वठवतात.

आजोबांचे नाटक सुरुवातीला नियोरला खरे वाटते व समोर दिसेलला हिंसाचार एका सिनेमाचे चित्रीकरण आहे यावर त्याचा विश्वास बसतो. नियोरचे पालक त्याला दूरवरच्या शांतता असलेल्या ठिकाणाच्या निवासी शाळेत हलवतात. पण नियोरचा एक जिवलग मित्र पुलाक हा एका गरीब वाहन चालकाचा मुलगा असतो. आपल्याच गावात राहून त्याला आजूबाजूला घडणारा हिंसाचार बघावा लागत असतो. दोन मित्रांच्या जीवनात घडणाऱ्या घटनांचा विरोधाभास दिग्दर्शकाने याद्वारे चित्रीत केला आहे.

नियोरच्या आईची भूमिका दीपाभीता शर्मा या अभिनेत्रीने साकार केली आहे. हिंसाचाराचा बालमनावर होणाऱ्या परिणामांची तिला विशेष काळजी वाटते. अशावेळी एका आईच्या हृदयात होणारी घालमेल तिने समर्थपणे आपल्या अभिनयातून व्यक्त केली आहे. बाल कलाकार नियोर, कुवाली आणि पुलक, यांनी आपल्या भूमिकांना न्याय दिला आहे.

एखाद्या घटनेचा सुरवातीला निषेध मग त्या विरोधात आंदोलन, हिंसाचार आणि दहशतवाद या सगळ्या घटनांचा लहान मुलांच्या मनावर व नंतर त्यांच्या आयुष्यावर कसा परिणाम होतो याचा विचार करण्यासाठी जगातले लोक क्षणभर थांबून विचार करतांना दिसत नाहीत. त्या दृष्टीने हा चित्रपट महत्त्वाचा आहे. मात्र जो दृष्टीकोन या चित्रपटात मांडण्यात आला आहे त्यांतील गुंतागुंत व घटनांवरचे भाष तितके समर्थपणे मांडण्यात आलेले नाही.

चित्रपटाच्या शेवटी नियोर, जो आता एक तरुण झालेला असतो, तो जगाला आवाहन करतो की वास्तव जरी भयावह असले तरी प्रत्येकाने एक चांगले स्वप्न बघायला हवे व ते स्वप्न सत्यात उतरवायला हवे.

हा आसामी चित्रपट म्हणजे केवळ तिथल्या एका खेड्यातील मुलांच्या जीवनात घडलेल्या घडामोडी, हिंसाचारामुळे फक्त येथील मुलांच्या मनावर होणाऱ्या परिणामांचे चित्रण नाही, तर सध्याच्या कालखंडात, सतत वाढणारा संघर्ष व घडणारा हिंसाचार व जगात इतरत्र घडणाऱ्या हिंसक घटना यांच्याकडे उदासीन वृत्तीने पाहण्याची प्रवृत्ती जगभर दिसून येते. त्याचे चित्रण या चित्रपटात करण्यात आले आहे. त्यावर भाष्य केले आहे. खरे तर जगात जेथे हिंसाचार उसळतो तेथे बालमनावर होणाऱ्या परीणामांचे प्रातिनिधीक स्वरुप या चित्रपटातून समोरे येते. घरातल्या मोठ्या माणसांनी घेतलेल्या निर्णयांमुळे या घरातल्या लहान मुलांना ज्या परिणामांना सामोरे जावे लागते त्याचे अतिशय संवेदनशील चित्रण या चित्रपटात आहे. ●


**प्रसाद होम प्रॉडक्टस्**

आमच्या येथे पेणचे पोहा पापड, बटाटा पापड, उडीद पापड, मिरगुंड, बटाटा मिरगुंड, बटाटा टिकली, नाचणी पापड, साबुदाणा फेणी, गहू - तांदूळ कुरडई, पोहा डांगर, सांडगी मिरची, भाजके पोहे इत्यादी डोंबिवलीत घरपोच मिळतील.

**संपर्क - प्रसाद खरे ९९२०३९१७४६ /९८२०५७३८८२**

म
हि
ला
वि
शे
ष

## हातशिवणीचे मुक्ता शूज
# मणिपूरची यशस्वी उद्योजिका मुक्तामणी मॉयरंगथेम

अनुवाद - जयवंत फडके
९८८१५५७८२१

पन्नाशी उलटलेली मुक्तामणी मॉयरंगथेम, मणीपूरची राजधानी इंफाळपासून ४० कि.मी. वर असलेल्या काचिंग येथे रहाते. पादत्राणे लोकरीच्या धाग्यांनी विणण्यातच या आनंदी, उत्साही महिलेचे विश्व सामावले आहे. जरी तिच्या घरावर अशी काही पाटी लावलेली नसली, तरी अवतीभवती वा अगदी जिल्ह्यातही मुक्तामणीला सर्वजण "शूमेकर" म्हणूनच ओळखतात व मणीपूरी भाषेत "मुक्तामणी खोंगोप सेंबी" म्हणजेच बूटांवर लोकरीच्या धाग्यांनी कारागिरी करणाऱ्या या उद्योजिकेच्या घराचा पत्ता कोणीही अगदी सहज सांगतात.

मुक्तामणी तिच्याकडील ३० कर्मचाऱ्यांसह मुलं, मुली, स्त्रिया, पुरुषांसाठी सर्व आकारांचे व मापाचे कलाकुसरीचे बूट तयार करते. या बुटांना इतकी लोकप्रियता लाभली आहे की विक्रीसाठी अनेकदा मालच शिल्लक रहात नाही. कारण अनेक व्यापारी हा माल विकत घेऊन भारतात विविध ठिकाणी व अगदी परदेशातही पाठवतात. आपल्या आजवरच्या प्रवासाच्या आठवणीत हरवून गेलेली मुक्तामणी म्हणाली. "मला ४ मुलं आणि त्यांचे शाळेचे बूट सदा न् कदा फाटायचे, तुटायचे.

एके दिवशी माझी मुलगी मला म्हणाली की, तिच्याकडे शाळेत जाण्यासाठी बूट नाहीत, आहेत तर फाटले आहेत. तिला तर घाई होती आणि जवळ पैसेही नाहीत! आता काय करावे या विचारात असताना मी त्या बूटांचा सोल काढला व लोकरीच्या धाग्याने तो पुन्हा विणून घट्ट केला. मुलगी शाळेतून घरी आल्यावर म्हणाली की तिच्या बाईंना हे बूट फारच आवडले व त्यांच्या मुलीसाठीही त्यांना असे बूट हवे आहेत. या शाळेतल्या बाई माझ्या पहिल्या ग्राहक." ही सर्व गोष्ट १९८९ सालातली. पुन्हा १९९० साली

■ ■ ■

*साधारण १९९१ मध्ये मणिपूर सरकारच्या उद्योगाच्या एका प्रदर्शनात तिने अशा बूटांच्या १२ जोड्या ठेवल्या होत्या व त्या हातोहात खपल्या. मंत्र्यांनी असे प्रशंसोद्गार काढले की, "या उद्योगाला पुढे बराच वाव आहे." प्रसिध्दी माध्यमांनीही तिची दखल घेतली व या उद्योगाचा श्रीगणेशा झाला. मुक्तामणीने मणिपूरच नव्हे तर दिल्लीतल्या प्रदर्शनातही भाग घेतला.*

■ ■ ■



मोठ्या मुलीचे फाटलेले बूट मुक्तामणीने असेच दुरुस्त करुन दिले. फक्त यावेळी त्यावर थोडीशी नक्षी व पट्टया जोडल्या होत्या. तिच्या शिक्षकांना व शेजाऱ्यानाही हे नक्षीदार बूट इतके आवडले की त्यांनाही आता असेच बूट हवे होते. मग मात्र मुक्तामणीच्या मनात ही गोष्ट चमकून गेली की हातशिवणीचे बूट हा माझ्या पोटापाण्याचा व्यवसाय होऊ शकतो.

साधारण १९९१ मध्ये मणिपूर सरकारच्या उद्योगाच्या एका प्रदर्शनात तिने अशा बूटांच्या १२ जोड्या ठेवल्या होत्या व त्या हातोहात खपल्या. मंत्र्यांनी असे प्रशंसोद्गार काढले की, “या उद्योगाला पुढे बराच वाव आहे.” प्रसिध्दी माध्यमांनीही तिची दखल घेतली व या उद्योगाचा श्रीगणेशा झाला. मुक्तामणीने मणिपूरच नव्हे तर दिल्लीतल्या प्रदर्शनातही भाग घेतला.



यातील उद्योजकतेचा भाग असा की हातशिवणीचे कलाकुसरीचे बूट या आधी उपलब्ध वा तयार होत नव्हते व हाच तिच्या उद्योगाचा वैशिष्ट्यपूर्ण असा विक्रीचा मुद्दा बनला. १९९३ साली मणिपूर सरकारच्या उद्योग व पर्यटन खात्यातर्फे यशस्वी उद्योजिका हा सन्मान तिला प्रदान करण्यात आला. तसेच तिला टेलीग्राफचे लिजंड ॲवॉर्ड व उत्तरपूर्वचे वसुंधरा ॲवॉर्डही मिळाले आहे. परंतु हे सर्व काही सहज घडून आलेले नाही. काही वेळा नवऱ्याला काही काम नाही म्हणून शेतात राबून व इतर फुटकळ कामे करुनही तिला हातातोंडाची गाठ घालावी लागलेली आहे. पण या परिस्थितीतही तिने विणकाम थांबवलेले नव्हते.

मुक्तामणी म्हणते की, सुदैवाने लहानपणापासूनच मला स्वेटर्स, शाली, मफलर इत्यादी विणून तयार करता येत होते. आता तिने फक्त या बुटांच्या व्यवसायावर लक्ष केंद्रित केले आहे व ही कला इतर महिलांनाही शिकवून आपल्या व्यवसायवृध्दीकडे लक्ष देत आहे.

तिची व्यथा अशी की जरी सरकारने माझ्या उद्योजकतेचे कौतुक केले असले तरी हा अगदी छोटा वा लघुउद्योग असल्याने कर्ज रुपाने आर्थिक सहाय्य अगदी जेमतेमच मिळते. त्यामुळे बूटविक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नातूनच तिचा व्यवसायवाढीचा विचार आहे.

आता तिची उत्पादने ऑनलाईनही उपलब्ध आहेत व ती आता ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, जपान येथे व भारतातही बरेच ठिकाणी मिळतात.

तिने तिच्या ब्रँडचे नाव “मुक्ता शूज” असे ठेवले आहे व साधारण ५०० ते २००० रुपये पर्यंत सर्व आकाराचे व मापांचे बूट, चप्पल, पट्टे अन् इतरही साहित्य सर्व वयोगटातील लोकांसाठी उपलब्ध आहे. हे बूट मुख्यत: लोकरीपासून बनत असल्याने हिवाळ्यात त्यांना प्रचंड मागणी असते व मुक्तामणीला आपल्या व्यवसायातून मान वर करायलाही वेळ नसतो. ●

# आदी समाजाची आई
# पासिघाट, अरुणाचलची इनि ताल्लो

(अमिता आपटे यांनी घेतलेल्या मुलाखतीवर आधारित अनुवादित लेख)

५५ वर्षांच्या इनि आजही तितक्याच कार्यमग्न, उत्साही आहेत. एक आदर्श महिला असं त्यांचं वर्णन करणं योग्य ठरेल. त्यांचं प्राथमिक शिक्षण रामकृष्ण मिशनच्या अलोंग येथील शाळेत झालं. तर उच्च माध्यमिक शिक्षण शिलाँग येथे झालं. अगदी तरुण असल्यापासून त्यांची प्रतिमा धाडसी, अन्यायाचा मुकाबला करण्यास न कचरणारी, टॉम - बॉईश वाटावी अशी होती. महिलांविषयी दुजाभाव बाळगणाऱ्या “महिला म्हणजे अबला” अशा पुरुषी मनोवृत्तीचा त्यांना तिटकारा होता. त्यामुळेच महिलांना स्वत:च्या पायावर उभं करणं, अन्यायाविरुध्द लढायला प्रवृत्त करणं हेच त्यांचं जीवनध्येय झालं ते आजपर्यंत!

शोषित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी आजही त्या प्रवास करतात. त्यांचं व्यक्तिमत्त्व झुंजार असलं तरी त्यांच्यातील मातृत्व सदैव जागृत असतं. जणू वात्सल्यमूर्तीच! म्हणूनच आदी जमातीत त्यांना “आई” या नावानेच हाक मारली जाते. मराठी भाषेतील “आई” अरुणाचलच्या आदी भाषेतही आईच असते याचं आश्चर्य वाटल्याशिवाय रहात नाही. अरुणाचलमधील आरोग्य विभागात सहाय्यक सचिवपदावर असलेल्या डॉक्टरांशी त्यांचा विवाह झाला आणि सामाजिक कार्याला वाहून घेण्यासाठी एक पूरक वातावरण तयार झाले.

त्यांचे विचार पहिल्यापासूनच महिला सबलीकरणाच्या बाजूने आहेत. परंतु स्त्रीमुक्तीच्या नावाने केवळ नारेबाजी करणे त्यांना पटत नाही. महिला आणि पुरुष यांच्यात सामंजस्य, समन्वय असायला हवा, त्यांच्यात कुणीही कमी -जास्त नाही या विचारांचं जनजागरण करणं अधिक महत्त्वाचं आहे, असं त्या मानतात. मुलांच्या तुलनेत मुलींकडे दुर्लक्ष केलं जातं. मुलींच्या विकासाकडे फारसं लक्षच दिलं जात नाही याचं शल्य त्यांना वाटत असे. म्हणूनच या दुजाभावाच्या विरोधात लढा देण्याचं त्यांनी ठरवलं. आणि १९९८ साली एका संस्थेच्या त्या अध्यक्ष झाल्या. महिलांना केवळ योग्य तो सल्ला देण्याचंच त्या काम करीत

■ ■ ■

*२०१८ साली त्यांनी “अयांग” संस्था सुरु केली. अयांग म्हणजे वात्सल्य, प्रेम, जिव्हाळा!* **Ayang** *या एकाच शब्दात या सर्व भावना व्यक्त होतात. २०१६ साली त्यांनी या सेवाभावी संस्थेची कायदेशीर नोंदणी केली. सध्या स्वयम्स्फूर्तीने रक्तदान करणाऱ्यांची संख्या ३०० आहे. रक्तदान करतांना अनेक वैद्यकीय चाचण्या रक्तदात्यांना कराव्या लागतात. त्यामुळे सहजगत्या रक्तदान करणाऱ्यांच्या शारिरीक चाचण्या केल्या जातात. गरजू व्यक्तींना तातडीने रक्त उपलब्ध व्हावे म्हणून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरही त्यांच्या संस्थेकडून केला जातो.*

■ ■ ■

नाहीत, तर प्रसंगी कायदेशीर लढाई देण्यासाठी त्या पिडित महिलेच्या बाजूने उभ्या राहतात. सरकारी अधिकाऱ्यांकडे आणि न्यायालयात जाण्यासाठी त्या सदैव तत्पर असतात.

इनि यांच्या कार्याची माहिती दूरवर पसरली आणि व्यसनमुक्ती बाबतही त्यांनी काम करावं असं त्यांना सांगितलं गेलं. सुरुवातीला त्यांनी दुर्लक्ष केलं. कारण महिलांना न्याय मिळवून देणं ही त्यांची प्राथमिकता होती. काही निर्णय घेण्यापूर्वी महिलांशी त्यांनी विचारविनिमय केला, त्यांची मतं जाणून घेतली. व्यसनाधिनतेमुळे कुटुंबं कशी उद्धवस्त होत आहेत याची माहिती त्यांना झाली. आणि मग मात्र व्यसनमुक्तीच्या कामातही त्यांनी पुढाकार घेतला. अमली पदार्थ विकणाऱ्यांची माहिती पोलिसांना देणं व त्यांच्या विरोधात कोर्टात साक्षी-पुरावे देणं त्यांनी सुरु केलं. सामाजिक कार्य तेव्हाच यशस्वी होऊ शकतं जेव्हा ते स्थानिक पातळीवर सुरु केलं जातं असं त्यांचं मत आहे. तरुणांमधील ड्रगचा फैलाव हे एक फार मोठं संकट समाजासमोर आहे. त्याबाबतीतही त्यांनी फार मोठं काम उभं केलं.

रक्तदान हे समाजासाठी फार उपयुक्त आहे हे इनि यांच्या मनावर चांगलंच बिंबलं होतं. त्या स्वत: २००८ पासून सातत्याने रक्तदान करीत आहेत. अपघात किंवा, महिलांच्या प्रसूतीसमयी रक्तदान महत्त्वाचं ठरु शकतं. त्यामुळे अनेकांना जीवनदानमिळतं. हॉस्पिटलमध्ये रुग्णांना भेटण्यास येणाऱ्या नातेवाईकांवर जेव्हा रक्तदानाची वेळ येते. तेव्हा मात्र ते पसार होतात याचा अनुभव त्यांनी घेतला. या मनोवृत्तीची त्यांना चीड आहे. त्यांनी स्वत:मात्र आजवर २२ वेळा रक्तदान केलेलं आहे. वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत वर्षातून दोन-तीन वेळा मी नक्कीच रक्तदान करणार असा त्यांचा निश्चय आहे. रक्तदान शिबीरं घेणं याला त्या फार महत्त्व देतात.

२०१८ साली त्यांनी "अयांग" संस्था सुरु केली. अयांग म्हणजे वात्सल्य, प्रेम, जिव्हाळा! Ayang या एकाच शब्दात या सर्व भावना व्यक्त होतात. २०१६ साली त्यांनी या सेवाभावी संस्थेची कायदेशीर नोंदणी केली. सध्या स्वयम्स्फूर्तीने रक्तदान करणाऱ्यांची संख्या ३०० आहे. रक्तदान करतांना अनेक वैद्यकीय चाचण्या रक्तदात्यांना कराव्या लागतात. त्यामुळे सहजगत्या रक्तदान करणाऱ्यांच्या शारिरीक चाचण्या केल्या जातात. गरजू व्यक्तींना तातडीने रक्त उपलब्ध व्हावे म्हणून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापरही त्यांच्या संस्थेकडून केला जातो.

परंतु आजच्या युवा वर्ग सामाजिक बांधिलकीपासून तसा दूरच असतो, याची त्यांना खंत वाटते. तरुणांनी उत्साहाने रक्तदान कार्यात सहभाग घ्यावा म्हणून त्या व्याख्याने आयोजित करतात. मुलींनी रक्तदान करावे यासाठी त्यांना विशेष प्रयत्न करावे लागतात. कारण रक्तदानाचा व्यक्तीच्या आरोग्यावर दुष्परिणाम होतो असा एक गैरसमज मुलींच्या मनात मोठ्या प्रमाणात असतो. आजही त्या एकट्याने प्रवास करतात. रामकृष्ण मिशनच्या शाळेत शिक्षण झाल्यामुळे आपल्यात मानवजातीची सेवा करण्याचा ध्येयवाद निर्माण झाला. समाजसेवा हीच ईश्वरसेवा अशी शिकवण मिळाल्याचे त्या अभिमानाने नमूद करतात. आज त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन अनेक महिला त्यांच्याप्रमाणेच समाजसेवेच्या कार्यात मग्न आहेत. त्यांच्याकडे "आई" म्हणून विश्वासाने पहाणाऱ्या या महिला सहकारी त्यांचे कार्य भविष्यातही सुरुच ठेवतील असा पूर्ण विश्वास आहे. ●

# श्रीमती जावेप्लु चाई

## अरुणाचलाच्या पहिल्या महिला न्यायाधीश

(हिंदुस्तान टाईम्स, नवी दिल्ली मध्ये निवेदिता खांडेकर यांच्या प्रकाशित झालेल्या लेखाचा अनुवाद)

एखाद्या सामान्य तरुणीसारखीच त्यांची वाटचाल सुरु झाली होती; पण त्यांच्या आयुष्यात एक असा “टर्निंग पॉईंट” आला, एक असं वळण आलं की त्या अरुणाचलच्या पहिल्या महिला न्यायाधीश झाल्या. जेमतेम तीस हजार जनसंख्या असलेल्या मिश्मी जनजातीच्या जावेप्लू चाई अरुणाचलच्या लोहित जिल्ह्यातील तेजूच्या! २०१३ साली वयाच्या चाळीसाव्या वर्षी अरुणाचल प्रदेश ज्युडिशिअल सर्व्हीस (APJS) परीक्षेत पहिल्या श्रेणीत पहिल्या क्रमांकाने त्या उत्तीर्ण झाल्या. त्याच वर्षी प्रशिक्षणानंतर पश्चिम सियांग जिल्ह्यातील बसार येथे ॲडीशनल डिस्ट्रीक्ट अँड सेशन्स जज पदावर त्यांची नियुक्ती झाली. २०१६ साली पदोन्नती मिळून त्या डिस्ट्रीक्ट अँड सेशन्स जज झाल्या. पण त्यांची युपिआ (Yupia) येथे बदली झाली.

अरुणाचल प्रदेशात न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होऊन आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण अल्प होते. परंतु चाई न्यायाधीश झाल्या आणि खटले निकाली लागण्याच्या प्रमाणात बरीच वाढ झाली. विशेषत: खून आणि बलात्काराच्या खटल्यात त्यांनी केलेल्या न्यायदानाची मोठ्या प्रमाणात प्रशंसा झाली. खुनाचा आरोप असलेल्या तीन आरोपींना चाई यांनी जन्मठेपेची शिक्षा सुनावली. तेव्हा ज्येष्ठ कार्यकर्त्या श्रीमती जार्जुम एटे (Jarjum Ete) यांनी वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेली त्या संबंधातील बातमीच आपल्या फेसबुक पेजवर टाकली आणि सोबत, “या निकालाने माझी न्यायव्यवस्थेवरील श्रध्दा दृढ झाली आहे...... आता तरी कित्येक वर्षे रेंगाळेलेले खटले निकाली लागतील अशी आशा करावी का?” अशी प्रतिक्रियाही नोंदवली.

■ ■ ■

*अरुणाचलातील परंपरेने चालत आलेल्या गाव पंचायतीच्या न्यायदान पध्दतीबाबत अनेक समज आहेत. त्याबाबत बोलताना त्या म्हणाल्या की केवळ मिश्मी जनजातीतच नव्हे; तर अन्य जनजातीतही ही न्यायदानाची पारंपारिक पध्दत आहे. या पध्दतीत तडजोडीला प्राधान्य दिलं जातं. त्यामुळे वादविवाद होऊनही त्यातून वैर किंवा शत्रूत्व निर्माण होत नाही. आधुनिक न्यायदान पध्दतीत याला* Alternative Dispute Resolution (ADR) Mecharism *म्हटलं जातं.*

■ ■ ■

न्यायदान प्रक्रिया पूर्ण होऊन जेव्हा एखाद्या आरोपीची निर्दोष मुक्तता होते. तेव्हा त्या आरोपीच्या डोळ्यातून पाझरणारे अश्रू पाहून एक न्यायाधीश म्हणून कर्तव्य बजावल्याचे मानसिक समाधान मला मिळते असं त्या म्हणतात. एक घटना सांगताना त्या म्हणाल्या, “ती माझी न्यायाधीश म्हणून बसार येथे पहिलीच नियुक्ती होती. खुनाच्या आरोपाखाली तुरुंगात असणाऱ्या एका आरोपीची मी निर्दोष मुक्तता केली. हा खून आरोपीकडून स्वसंरक्षणाच्या हेतूनेच घडला आहे. परिस्थितीजन्य पुरावे आणि साक्षीदारांच्या साक्षी त्याचे निर्दोषत्व सिध्द करण्यास पुरेश्या

आहेत असा निकाल मी दिला. हा आरोपी तब्बल १२ वर्षे तुरुंगात होता. सुटका झाल्यावर त्याने न्यायाधीशांना भेटायचे आहे अशी विनंती केली. ती मान्य होऊन त्याला भेटीची परवानगी देण्यात आली.

तो माझ्यासमोर हाताची घडी घालून व मान झुकवून उभा राहिला आणि त्याच्या "गालो" या स्थानिक बोलीभाषेत काही सांगण्याचा प्रयत्न करु लागला. तो म्हणत होता, " भावाचा खून केल्याबद्दल आता तुला फाशीच दिली जाणार असे माझे गाववाले मला म्हणत असत. पण जजसाहेबांनी एकूण परिस्थिती समजून घेऊन न्याय दिला व मला दोषमुक्त केले. त्यांचे माझ्यावर फार उपकार आहेत. त्या फार दयाळू आहेत" असं म्हणून तो जेव्हा चेंबरच्या बाहेर पडला तेंव्हा हुंदके देत रडू लागला.

अरुणाचलातील परंपरेने चालत आलेल्या गाव पंचायतीच्या न्यायदान पध्दतीबाबत अनेक विवाद आहेत. त्याबाबत बोलताना त्या म्हणाल्या की केवळ मिश्मी जनजातीतच नव्हे; तर अन्य जनजातीतही ही न्यायदानाची पारंपारिक पध्दत आहे. या पध्दतीत तडजोडीला प्राधान्य दिलं जातं. त्यामुळे वादविवाद होऊनही त्यातून वैर किंवा शत्रूत्व निर्माण होत नाही. आधुनिक न्यायदान पध्दतीत याला Alternative Dispute Resolution (ADR) Mecharism म्हटलं जातं. माझ्या कार्यकाळात या पध्दतीचा पाठपुरावा करण्याचा मी प्रयत्न करणार आहे. कारण त्यामुळे खटल्यांची संख्या कमी होऊ शकेल असं मला वाटतं.

अरुणाचलातील मागास समजल्या जाणाऱ्या मिश्मी जनजातीसाठी चाई यांची यशोगाथा निश्चितच प्रेरणादायी आहे. त्यांनी शिलाँग येथील नॉर्थ ईस्टर्न हिल युनिव्हर्सीटी मधून पदवी प्राप्त केली आणि त्यांच्या गावातील चार चौघांप्रमाणे पैसे मिळवण्यासाठी काही व्यवसाय करण्याचे ठरवले. परंतु चाईंची शिक्षणातील आस्था पाहून त्यांचा एक अरुणाचली मित्र आणि एक गैर-अरुणाचली अधिकारी यांनी चाईला तसे करण्यापासून परावृत्त केले. मिश्मी जनजातीत उच्च शिक्षण घेणाऱ्यांची संख्या किती कमी आहे आणि तू कशी एक हुशार विद्यार्थिनी आहेस असे सांगून त्यांनी तिचे मन वळवले.

कुटुंबियांनीही चाईंच्या उच्च शिक्षण घेण्याच्या निर्णयाला पाठींबाच दिला. या सर्व मित्रांचा, हितचिंतकांचा सल्ला ऐकल्याबद्दल त्या आता समाधानी आहेत. असा सल्ला देणाऱ्या सर्वांप्रती त्यांच्या मनात कृतज्ञतेचा भाव आहे. लेखाच्या सुरुवातीला ज्या एका वळणाचा, टर्नींग पॉईंटचा उल्लेख आला आहे तो किती महत्त्वाचा आहे हे आता वाचकांनाही कळले असेल. ●

**ईशान्य वार्ता च्या वाटचालीत माझाही सहभाग**

ईशान्य वार्ता मासिकाला एक नवीन सभासद मिळवून द्या. ते घर मग सहजगत्या ईशान्य भारताशी जोडले जाईल. इतकी साधी बाब आपण नक्कीच करु शकतो. आणि हे ही एक महत्त्वाचे कार्य आहे.

**- एक सक्रीय हिंतचिंतक**

# अरुणाचलातील समाजशक्तीचं दर्शन

- अमिता आपटे

९४२२९६९६१६



■ ■ ■

हा जो नवा प्रकल्प माझ्या हाती दिला गेला होता. त्यात मला विविध जमातीतील लोकांच्या लग्न, बारसे, सणसमारंभ इत्यादी चालीरीतींचे डॉक्युमेंटेशन आणि व्हिडिओ शूटिंग करुन घ्यायचे होते. यासाठी लागणारा खर्च संघटनेकडून मिळणार होता. पण विविध ठिकाणी फिरुन अभ्यासू आणि कलाकार लोकांना हा विषय समजावून देऊन, त्यांना हे काम करण्यासाठी उद्युक्त करणे, ती कामे लवकरात लवकर त्या त्या लोकांकडून पुर्ण करुन घेणे, असं काम मला प्रामुख्याने करायचं होतं.

■ ■ ■

मी कॉलेजला असताना, ईशान्य भारतातील काही मुली जनकल्याण समितीच्या माध्यमातून शिक्षणासाठी म्हणून आमच्या गावात आल्या. मग त्यांची सगळी व्यवस्था, शाळा, खाणेपिणे, खेळ, कपडे, अभ्यास यासाठी महिला कार्यकर्त्यांची गरज असल्यामुळे आम्ही काही मैत्रिणी, काही मोठ्या महिला तिथे नियमितपणे जाऊ लागलो. ईशान्य भारताशी पहिली ओळख झाली ती अशी!

माझ्या भागात मी वनवासी कल्याण आश्रमाचे काम करतेच. पण ईशान्य भारतात जावे, काही काम करावे ही सुप्त जुनी इच्छा काही जिरली नव्हती. आणि ती संधी एक दिवस आली. माझ्या नवऱ्याचे मित्र श्री. सुशील सायकर हे दरवर्षीप्रमाणे सायन्सचे छोटेछोटे प्रोजेक्टस घेऊन अरुणाचल प्रदेश येथे जाणार आहेत असे आम्हाला कळले. मग मीही जाण्याची तयारी केली. या १० दिवसांत आम्ही विविध शाळांमध्ये फिरलो. शास्त्रातील गमतीदार प्रयोगांची मुलांना ओळख करुन दिली. त्यांच्याकडून काही प्रयोग करुन घेतले. या काळात तिथे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांशी ओळखी झाल्या.

घरी आले, पण मनात म्हणावं तसं समाधान नव्हतं. आपलं काम पूर्ण झालं नाहीये. आणि अजून एकदा तरी परत जाऊन यायला पाहिजे असं मनात येत होतं. मग क्काय! संघटनेशी संपर्क केला. सोयीस्कर अशा वेळा ठरवल्या आणि गेले परत! यावेळी घरोघरी जाऊन काही माहिती जमवण्याचं काम मला मिळालं होतं आणि मग ती माहिती संकलित करुन रिपोर्ट बनवून संघटनेला द्यायचा होता. हे काम अगदी मनाजोगतं पुरं झालं आणि मला अजूनच हुरुप आला.

परत येण्यापूर्वी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलणे झाले होते. त्याप्रमाणे ४-५ महिन्यांतच पुढचा प्रवास ठरला. मी प्रामुख्याने अरुणाचल प्रदेशात काम करत असल्यामुळे इथल्या स्थानिक आणि पदाधिकारी वर्गाशीही आतापर्यंत ओळख, मैत्री झाली होती. इथे पूर्णवेळ स्त्री-पुरुष प्रचारकांना फुल टाईमर्स असं म्हटलं जातं. या महिला कार्यकर्त्या तर माझ्याच वयाच्या पुढे मागे असणाऱ्या मुली आहेत. त्यामुळे औपचारिकता, नवखेपणा संपून मोकळेपणा कधी आला, ते आम्हा कोणालाच समजलं नाही. पोळी हे काही तिथलं

## विशेष कामगिरी केलेल्या स्त्रियांच्या मुलाखती

याच्या पुढचे काम तर खूपच उत्साहवर्धक आणि माझ्या आवडीचे होते. अरुणाचलातील सन्माननीय, आणि आपल्या क्षेत्रात काही विशेष कामगिरी केलेल्या काही यशस्वी स्त्रियांच्या मुलाखती घेण्याचे काम मला मिळाले. अठरा दिवसांचा हा प्रवास म्हणजे माझ्यासाठी अमूल्य आठवणींचा ठेवा आहेत. या सगळ्याच स्त्रिया आपण विचारही केला नसेल अशा अनंत अडचणीतून मार्ग काढत आयुष्याच्या लढाईत सफल झाल्या आहेत. स्त्रीशक्तीचं हे एकेक रुप जवळून अनुभवताना थक्क व्हायला होत होतं. या यशस्वी महिलांत कोणी अनाथांची माय आहे तर कोण आपल्या राज्यातल्या पोराबाळांना ड्रग्ज च्या विळख्यातून सोडवण्यासाठी अहोरात्र, वर्षानुवर्षं झटते आहे. कोणी एव्हरेसट सर करून आली आहे, तर कोणी शिक्षणाचा पाया रचते आहे. कोणी जनजातीच्या सर्वोच्च अध्यात्मिक गुरुचं स्थान आहे, तर कोणी पहिली आयएएस असा किताब धारण करुन आहे. कोणी पद्मश्री प्राप्त अधिकारी तर कोणी सामान्य गृहिणी असूनही असामन्य कर्तबगार! आदिशक्ती, स्त्रीशक्तीचं वारंवार प्रत्यंतर येतं होतं. याच मुलाखती आता गोष्टीरुपात पुस्तकातून वाचकांच्या भेटीला येऊ घातल्या आहेत.

नियमित अन्न नाही. पण मुंबई कि दीदी म्हणून जिथे जाऊ, तिथे काही ना काही विशेष मुद्दाम बनवलेला पदार्थ खायला मिळतो. स्थानिकांचे प्रेम, त्यांचा उत्साह पाहून मलाच कितीदातरी अवघडल्यासारखे होई. अतिशय प्रेमळ, पटकन विश्वास टाकणारा अगत्याने अगत्य करणारा असा हा समाज आहे.

हा जो नवा प्रकल्प माझ्या हाती दिला गेला होता. त्यात मला विविध जमातीतील लोकांच्या लग्न, बारसे, सणसमारंभ इत्यादी चालीरीतींचे डॉक्युमेंटेशन आणि व्हिडिओ शूटिंग करुन घ्यायचे होते. यासाठी लागणारा खर्च संघटनेकडून मिळणार होता. पण विविध ठिकाणी फिरुन अभ्यासू आणि कलाकार लोकांना हा विषय समजावून देऊन, त्यांना हे काम करण्यासाठी उद्युक्त करणे, ती कामे लवकरात लवकर त्या त्या लोकांकडून पुर्ण करुन घेणे, असं काम मला प्रामुख्याने करायचं होतं.

एकंदरीत सुरुवातीला तरी मला हा उंटावरुन शेळ्या हाकण्यासारखा प्रकार वाटत होता. पण संघटनेला जबाबदारी घेऊन काम पुढे सरकवणारी, ग्लॅमरस वाटेल अशी व्यक्ती या कामासाठी हवी होती. मग मीही उत्साहाने हे काम हाती घेतलं. आज ५ जमातींसाठीची आपली शुटिंग्ज आणि लिखित माहिती स्वरुपातील पुस्तिका तयार झाल्या आहेत. कामात अडथळे तर खूपच आले. वेळखाऊ आणि कंटाळवाणे वाटू शकेल असे हे काम माझ्या कार्यकर्ते मित्रवर्यांच्या सहकार्यानेच मी अगदी समाधानपूर्वक पूर्ण करु शकते आहे. आता हेच काम आणखी काही जमातींसाठी करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली आहे. पुढच्या वेळी जाईन तेव्हा ते सुरु करेन. ●

# पूर्वांचलातील सेवाकार्यांशी जोडले जाणं हे माझं भाग्य



**श्वेता काणे**

**९१६७०७८५७६**

माणूस नशीब घेऊन जन्माला येतो पण त्याचं प्रारब्ध त्याच्या आयुष्याला वळण देतं. अनेक चांगल्या वाईट घटना त्याला एखाद्या दैवी कार्यासाठी तयार करीत असतात. आता माझंच बघाना! एकदा मी काणे कुल संमेलनाला गेले. साहाजिकच तिथे काणे कुलवृत्तांताचा विषय निघाला. काही जणांना असं वाटलं की काणे कुळातील काही कर्तृत्ववान काणे कुलबंधू, भगिनी यांच्या कार्याविषयी ध्वनीचित्रफित करावी. निवड करता ८ व्यक्तींवर ध्वनीचित्रफीत करण्याचे ठरले आणि मी ते काम हौसेने हाती घेतले. तेव्हा प्रथमच मला भैय्याजी काणे यांच्या कार्याची माहिती मिळाली.

आणखी एक योगायोग असा, की कै. भैय्याजी काणे यांचे माजी विद्यार्थी श्री. जयवंत कोंडविलकर यांच्याशी भेट झाली. त्यांच्याकडून मणिपूरमधील कै. भैय्याजी काणे यांच्या नावाच्या शाळा व पूर्व सीमा विकास प्रतिष्ठान या संस्थेच्या कार्याची माहिती मिळाली. माझी उत्सुकता एवढी वाढली की मी मणिपूरला या तीन शाळा बघायला गेले. शाळा चांगल्या प्रकारे चालायच्या असतील तर मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता जाणवू लागली. सध्या कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्या अशी मोठ्या प्रमाणातील आर्थिक मदत कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सीबिलिटी (CSR) या संकल्पनेनुसार करीत असतात. मात्र त्यासाठी अद्ययावत प्रोजेक्ट रिपोर्ट सादर करावा लागतो. सध्या मी त्यावर काम करीत आहे.

आसाम आणि अरुणाचल प्रदेशात विवेकानंद केंद्राचे खूप काम आहे. हातमाग विणकाम व्यवसाय प्रशिक्षण केंद्र गेले तीस वर्ष खटखटी येथे सुरु आहे. ते काम अधिक व्यापक, मोठ्या प्रमाणावर कसे करता येईल यासंबंधी उपाययोजना ठरवण्यासाठी एक रिपोर्ट तयार करायचा होता. केंद्राचे प्रवीण दाभोळकर व मीरा कुलकर्णी यांची भेट झाली आणि ते काम करायचे मी ठरवले. आणि मग माझ्या आसामच्या फेऱ्या सुरु झाल्या.

याच दरम्यान आसाममधील कारबी जनजातीत काम करायला मिळालं. धर्मांतरं कशी घडवून आणली जातात हे अगदी जवळून बघायला मिळालं. आपली माणसं यामुळे दुरावली जात होती. पण नि:स्वार्थपणे, आपुलकीने काम केलं की ती आपलीच राहतात हे ही जाणवलं.

■ ■ ■

**आता केवळ देणग्यांमुळे आपल्या संस्था चालतील अशी स्थिती नाही. त्यासाठी CSR मार्फत भक्कम आर्थिकबळ उभारण्याची जबाबदारी काही लोकांनी घेतली आहे. त्यांच्या बरोबर काम करण्याची संधी मिळाली. त्याचप्रमाणे ईशान्येतील तरुणपिढीचे अन्य राज्यात होणारे स्थलांतर थांबवण्यासाठी उपजीवीकेची कायमस्वरुपी साधने उभी करावी लागतील. ठराविक चौकटीबाहेर जाऊन विचार करणारी आणि तो विचार वास्तवात आणणारी माणसं हवी आहेत.**

■ ■ ■

शेवटी आपुलकीच्या नात्याची नाळ कुठेतरी जोडलेली असते ना! गेली कित्येक वर्ष रुजलेली सावत्रपणाची भावना त्यांच्या मनातून एका रात्रीत जादूची कांडी फिरवल्यासारखी जाणार नाही. श्रध्दा आणि सबुरी हाच एक मार्ग आहे. करबी ट्राईबमध्ये लेखिमोन हा एक सनातन पंथ आहे. देवाबाबतचे अनेक गैरसमज दूर करीत करीत हा पंथ आपले अस्तित्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्नात आहे.

आता केवळ देणग्यांमुळे आपल्या संस्था चालतील अशी स्थिती नाही. त्यासाठी CSR मार्फत भक्कम आर्थिकबळ उभारण्याची जबाबदारी काही लोकांनी घेतली आहे. त्यांच्या बरोबर काम करण्याची संधी मिळाली. त्याचप्रमाणे ईशान्येतील तरुणपिढीचे अन्य राज्यात होणारे स्थलांतर थांबवण्यासाठी उपजीवीकेची कायमस्वरुपी साधने उभी करावी लागतील. ठराविक चौकटीबाहेर जाऊन विचार करणारी आणि तो विचार वास्तवात आणणारी माणसं हवी आहेत. मला स्वत:ला आता असं वाटतंय की पूर्वांचलासाठी काम मी करीतच राहणार आहे. जणू ते माझ्या प्रारब्धातच लिहिलं गेलं आहे. ●

## भावपूर्ण श्रध्दांजली

## "दहशतवादी हल्लेखोरांना धडा शिकवा"



**हुतात्मा मनेश्वर बासूमतारी**

"आपले जवान आणि माझे वडील यांच्यावरील हल्ल्याचा बदला घ्यायला हवा." असे संतप्त उद्‌गार पुलावामा हल्ल्यात हुताम्या झालेल्या आसामच्या जवान मनेश्वर बासूमतारी यांच्या मुलीने काढले.

बासूमतारी यांच्या मागे पत्नी सुमती, आणि मुलगा आहे. बासूमतारी नुकतेच आसाममधील कलबारी गावी त्यांच्या घरी येऊन गेले होते.

---

हल्ला झाल्यानंतर या हल्ल्यात आसाममधील आणखी ३ जवान हुतात्मा झाल्याची बातमी सोशल मिडियावर फिरत होती. परंतु या तीनही सैनिकांनी मायझिंक बासुमतारी (उदलगिरी), पवित्र बर्मन (बोंगाईगाव), अनंत सैकिया (नागांव) यांनी आपण सुखरुप असल्याची पोस्ट सोशल मिडियावर टाकली आणि सर्वांचा ताण हलका झाला.

या हल्ल्यात आसाममधील अन्य एक जवान कनक कलिता जखमी झाला आहे. सुरुवातीला त्यांना हौतात्म्य प्राप्त झाल्याची अफवा पसरली होती परंतु "मी सुखरुप असून फक्त जखमी झालो आहे. उपचार सुरु आहेत" अशी माहिती त्यांनी स्वत:च व्हिडिओ कॉल वरुन दिली तेव्हा त्यांच्या घरच्यांचे समाधान झाले. मात्र ही बातमी पसरताच पाकिस्तानचा निषेध करण्यासाठी त्यांच्या गावाच्या परिसरात हजारो लोकांनी निषेध मोर्चा काढला. पुलावामा हल्ल्याचा ईशान्य भारतातील सर्व राज्यात तीव्र निषेध करण्यात आला.

# अरुणाचल प्रदेशचा जांभळा चहा

- सुभाष जोशी
९८६७५०४८४६

ईशान्य भारतातल्या अरुणाचल प्रदेशातील "डोनयी पोलो" या चहाच्या मळ्यातून प्रथमच "जांभळा चहा" लिलावासाठी बाजारात आला आहे.

आता अरुणाचल प्रदेशातील हा "जांभळा चहा" लिलावात कोणत्या किमतीला विकला जातोय याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे. काही वर्षापूर्वी अरुणाचल प्रदेशातील पूर्व सीएंग जिल्ह्यातील जंगलात या अनोख्या चहाची रोपे सापडली होती. "डोनयी पोलो" या चहाच्या मळ्यात त्यांची लागवड करण्यात आली व आता प्रथमच हा चहा विक्रीसाठी उपलब्ध होत आहे. एक किलो "जांभळा" चहा उपलब्ध होण्यासाठी चहाच्या रोपांची १०,००० पाने लागतात.

हा चहा सौम्य चवीचा असून त्याची चव ग्रीन टी सारखीच असते. सन १९८७ पासून "Siang Tea and Industries Pvt Ltd." या उद्योगाच्या अंतर्गत "डोनयी पोलो" या चहाच्या मळ्याचे कामकाज चालते. "डोनयी पोलो" ने आतापर्यंत चहाच्या विविध नमुन्यांचे अविष्करण केले आहे. विशेष प्रकारच्या चहाच्या रोपांची लागवड करण्याबरोबरच या चहाच्या मळ्यात CTC, Orthodox, oolong, green and white चहांची पण लागवड केली जाते.

खरेतर "जांभळा चहा" हा आसामातल्या चहाचा नमुना, पण आफ्रिकेतल्या केनिया येथे त्याची पुनरुत्पत्ती करण्यात आली. आत्तापर्यंत फक्त केनियातच तो उपलब्ध होता. पण त्याचे जन्मस्थळ ईशान्य भारतच असल्याने "डोनयी पोलो" ने त्याला प्रकाश झोतात आणले आहे. चीन व भारतानंतर केनियात चहाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. तसेच तेथून चहाची निर्यात जगभर केली जाते.

जांभळा चहा जगभर पर्पल टी म्हणून ओळखला जातो. मोहक रंगाबरोबरच तो आरोग्यदायी असल्याने त्याची किंमत जास्त आहे. या चहात ॲन्योसामनीन हे द्रव्य अतिशय गुणकारी व औषधी गुणांनी युक्त आहे. हृदय व रक्तवाहिन्यांचे रोगांवर हा चहा अतिशय फायदेमंद आहे व ॲंटिऑक्सीडंट असून कॅन्सर सारख्या दुर्धर रोगांवर उत्तम गुणकारी म्हणून सिध्द झाला आहे.

या चहाच्या सेवनाने डोळ्यांचे आरोग्य उत्तम राहते, रक्तातले साखरेचे प्रमाण नियंत्रणात येते व कोलेस्ट्रॉल योग्य प्रमाणात राहते. यांत कॅफीन अत्यंत कमी प्रमाणात असल्याने ग्रीन टी पेक्षा पर्पल टी घेणे लोक पसंत करतात. या चहाचा स्वाद कडक व लज्जतदार असल्याने भारतीयांना तो नक्कीच आवडेल. पण या चहाची किंमत सामान्यांच्या आवाक्यात नसल्याने केव्हातरी मौज म्हणून पिण्यास हरकत नाही. ●

# डोंबिवलीत “ओळख ईशान्य भारताची” प्रदर्शन

-प्रतिनिधी



“विविसु डेहरा” आणि “मी डोंबिवलीकर” मासिकातर्फे ओळख ईशान्य भारताची या तीन दिवसीय प्रदर्शनाचे आयोजन डोंबिवलीतील बालभवन कलादालनात दिनांक १ ते ३ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन मा. राज्यमंत्री श्री. रवींद्र चव्हाण यांचे हस्ते झाले, त्याचप्रमाणे ईशान्य वार्ता मासिकाच्या “विकास दर्शन” विशेषांकाचे प्रकाशनही राज्यमंत्र्यांच्या हस्ते झाले.

या प्रसंगी बोलताना श्री. रवींद्र चव्हाण म्हणाले की, संघ संबंधित अनेक संस्था व व्यक्ती ईशान्य भारताच्या विकासासाठी गेली अनेक दशके निरपेक्षपणे काम करीत आहेत. केंद्र शासनानेही गेल्या चार वर्षात या भागाकडे विशेष लक्ष दिले व त्याचे चांगले परिणामही दिसून येत आहेत. हे प्रदर्शन अत्यंत उत्तम प्रकारे भरविण्यात आले आहे. असेच प्रदर्शन अन्य शहरांमधूनही आयोजित व्हायला हवे, असे उद्गारही त्यांनी काढले.



आयोजक कुणाल सुतावणे माहिती देताना

ज्येष्ठ कार्यकर्ते श्री. दिलीप परांजपे यांनी या भागात पर्यटकांनी मोठ्या संख्येत जायला हवे यावर भर दिला व त्यातून एकात्मता कशी साध्य होते याची उदाहरणे ही दिली. प्रमुख वक्ते चंद्रकांत जोशी यांनी ॲक्ट ईस्ट धोरणानुसार केंद्र शासनाने जी अनेक कामे केली त्याचा आढावा घेतला व त्याचा परिणाम म्हणून चीनला शह देण्यात भारत कसा यशस्वी ठरला आहे हे सोदाहरण स्पष्ट केले. मा. आबासाहेब पटवारी यांनी कार्यक्रमाचा समारोप करताना “हे प्रदर्शन नसून मी पूर्वांचलातच वावरत आहे, असे मला वाटत आहे” या शब्दात प्रदर्शनाचे कौतुक केले. ईशान्य वार्ताचा “विकास दर्शन विशेषांक” उत्तम झाला आहे. हे मासिक

Postal Reg. No. **THC / 151 / 2018-2020** Posted at BPC Kalyan on 1st day of every month.
RNI Reg. No. **MAHMAR / 2012 / 45108** Total No. of Pages 32
License to Post without Prepayment under WPP License No. **NMR/Tech/WPP-13/Thane/2019**




**श्री. श्रीकृष्ण सहस्त्रबुध्दे बोगीबील पुलाच्या प्रतिकृतीची माहिती देताना**

जनजागृतीचे महत्त्वाचे काम गेली दहा वर्ष सलगपणे करीत आहे याचाही त्यांनी विशेष उल्लेख केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सुरेश देशपांडे यांनी केले.

प्रदर्शन पहायला नागरिकांनी एकच गर्दी केली होती. शालेय विद्यार्थ्यांनीही या प्रदर्शनाला भेट दिली. श्री. सहस्त्रबुध्दे यांनी उभारलेली बोगीबिल पुलाची प्रतिकृती आकर्षणाचा विषय ठरली.अतिशय आकर्षक प्रकारे प्रदर्शन उभारण्यात श्री. विलास सुतावणे व कुणाल सुतावणे यशस्वी ठरले आहेत. असे प्रदर्शन आमच्याही शहरात भरवावे यासाठी अनेकांनी संपर्क



हे मासिक मुद्रक, प्रकाशक **श्री. जयवंत कोंडविलकर** यांनी **फ्रेंडस् ऑफ नॉर्थईस्ट सोसायटी**, डोंबिवलीकरिता **अक्षर ग्राफिक्स**, एफ-४, श्री पार्श्व इंडस्ट्रियल इस्टेट, व्ही. पी. रोड, डोंबिवली (पूर्व) येथे छापून ९, जय गायत्री सोसायटी, गोपाळ नगर रस्ता क्र १, डोंबिवली (पूर्व) ४२१२०१ येथे प्रकाशित केले